सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ८२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १९ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## राज ठाकरेंची उद्धव ठाकरेंशी युतीची तयारी : म्हणाले - आमच्यातील वाद अन् भांडण महाराष्ट्र व मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी फार किरकोळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

राज ठाकरे व उद्धव ठाकरे एकत्र येणार का? हा अवघ्या महाराष्ट्राला पडलेला प्रश्न आहे. यापूर्वी राज यांनी स्वतःहून पुढे येत उद्धव ठाकरे यांना टाळी देण्याचा प्रयत्न केला. पण उद्धव यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. आता मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा उद्धव यांच्यासोबत युती करण्याचे सकारात्मक संकेत दिलेत. 'महाराष्ट्राच्या अस्तित्वासाठी, मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी आमच्यातील वाद, भांडणे व इतर गोष्टी फार क्षुल्लक आहेत. त्यामुळे एकत्र येणे व एकत्र राहणे यात फार काही कठीण गोष्ट आहे असे मला वाटत नाही,' असे ते म्हणालेत.

राज ठाकरे यांनी अभिनेते व दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या वॅको सॅनिटी या यूट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी विविध मुद्यांवर परखड भाष्य केले. यावेळी महेश मांजरेकर यांनी त्यांना एकेठिकाणी उद्धव ठाकरे यांच्यासोबत युती करण्याचा प्रश्न केला. त्यावर राज यांनी अत्यंत सकारात्मक उत्तर दिले. ते म्हणाले, 'प्रश्न असा आहे की, कोणत्याही मोठ्या गोष्टीसाठी आमच्यातील वाद आमच्यातील भांडणे हे अत्यंत किरकोळ आहेत. महाराष्ट्र खूप मोठा आहे. या महाराष्ट्राच्या अस्तित्वासाठी, मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी ही भांडणे, वाद व इतर गोष्टी फार क्षुल्लक आहेत. अत्यंत क्षुल्लक आहेत.

### हा माझ्या एकट्याच्या इच्छेचा प्रश्न नाही

त्यामुळे एकत्र येणे व एकत्र राहणे यात फार काही कठीण गोष्ट आहे असे मला वाटत नाही. पण प्रश्न फक्त इच्छेचा आहे. हा माझ्या काही एकट्याच्या इच्छेचा किंवा स्वार्थाचा विषय नाही. मला वाटते आपण महाराष्ट्राचा लार्जर पिक्चर पाहिला पाहिजे. महाराष्ट्रातील सर्वच राजकीय पक्षांमधील मराठी लोकांनी एकत्र येऊन एक पक्ष स्थापन केले पाहिजे असे मला वाटते.'

### मी आयत्या पिठावर रेघोट्या मारत नाही

महेश मांजरेकर यांनी यावेळी राज यांना एकत्र येणे शक्य नसेल तर तुम्ही शिंदे सेना अर्थात शिवसेना टेकओव्हर करण्यास हरकत नव्हती असा प्रश्न केला. त्यावर राज ठाकरे यांनी आपल्या खास शैलीत उत्तर दिले. 'मी आयत्या पिठावर रेघोट्या मारत नाही. पहिली गोष्ट अशी आहे की, शिंदेंचे बाहेर जाणे किंवा आमदार फुटणे हा राजकारणाचा एक वेगळा भाग झाला. मी शिवसेनेतून बाहेर पडलो तेव्हा अनेक आमदार, खासदार माझ्याकडे आले होते. मला त्याचवेळी हे शक्य होते. पण माझ्या मनात एकच गोष्ट होती की, मी बाळासाहेब सोडले तर मी कुणाच्याही हाताखाली काम करणार नाही. त्यावेळची परिस्थिती अशी होती.


राज ठाकरेंची साद ; उद्धव ठाकरेंकडून प्रतिसाद

## उद्धव ठाकरेंचेही राज ठाकरेंना टाळी देण्याचे संकेत:'महाराष्ट्र हितासाठी किरकोळ वाद बाजूला ठेवण्याची माझीही तयारी' असल्याचे केले स्पष्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी महाराष्ट्र व मराठी माणसाच्या भल्यासाठी उद्धव ठाकरेंसोबत एकत्र येण्याचे संकेत दिले होते. त्यांच्या या प्रस्तावाला उद्धव ठाकरे यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. पण सोबतच एक अटही ठेवली आहे. महाराष्ट्र व मराठी माणसाच्या हितासाठी माझीसुद्धा आपसातील किरकोळ वाद बाजूला ठेवण्याची तयारी आहे. पण महाराष्ट्राच्या हिताच्या आड जो कुणी येईल, त्याचे स्वागत मी करणार नाही, त्याला मी घरी बोलावणार नाही, मी त्याच्या घरी जाणार नाही हे प्रथम ठरवा, असे ते म्हणालेत.

राज ठाकरे यांनी अभिनेते व दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या वॅको सॅनिटी या यूट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यासोबत युती करण्याचे सकारात्मक संकेत दिले. कोणत्याही मोठ्या गोष्टीसाठी आमच्यातील वाद आमच्यातील भांडणे हे अत्यंत किरकोळ आहेत. महाराष्ट्र खूप मोठा आहे. या महाराष्ट्राच्या अस्तित्वासाठी, मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी ही भांडणे, वाद व इतर गोष्टी फार क्षुल्लक आहेत, असे ते म्हणाले. त्यांच्या या प्रस्तावाला उद्धव ठाकरे यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला.

### किरकोळ भांडणे मी सुद्धा बाजूला ठेवणार

उद्धव ठाकरे मुंबईत आयोजित भारतीय कामगार सेनेच्या मेळाव्यात बोलताना म्हणाले, मराठीसाठी आणि महाराष्ट्राच्या हितासाठी अगदी किरकोळ भांडणे ( तुम्ही बाहेर गेल्यानंतर कळेल किरकोळ भांडणाचा संदर्भ काय आहे) बाजूला ठेवायला मी सुद्धा तयार आहे. मी सर्व मराठी माणसांना मराठी व महाराष्ट्राच्या हितासाठी एकत्र येण्याचे आवाहन करतो. पण माझी अट एक आहे. लोकसभा निवडणुकीवेळी आम्ही हे लोक महाराष्ट्रातील सर्व उद्योगधंदे हे लोक गुजरातला घेऊन जात होते. तेव्हाच तुम्ही विरोध केला असता तर आज हे सरकार तिकडे (दिल्लीत) बसले नसते. तिथे आम्ही महाराष्ट्राच्या हिताच्या विचार करणारे सरकार केंद्रात बसवले असते. राज्यात सुद्धा आपल्या महाराष्ट्राच्या विचार करणारे सरकार बसले असते. त्याचवेळी हे काळे कामगार कायदे कचऱ्याच्या पेटीत फेकून दिले असते. पण तेव्हा पाठिंबा द्यायचा आता विरोध करायचा मग परत तडजोड करायची हे असे चालणार नाही.

### मी आजच सर्व वाद मिटवून टाकतो

महाराष्ट्राच्या हिताच्या आड जो कुणी येईल, त्याचे स्वागत मी करणार नाही, त्याला मी घरी बोलावणार नाही, मी त्याच्या घरी जाणार नाही. त्याच्यासोबत पंक्तीला बसणार नाही, हे पहिल्यांदा ठरवा, त्यानंतर महाराष्ट्राच्या हिताच्या गोष्टी करा. बाकी आमच्यात माझ्याकडून कोणतीही भांडणे नव्हतीच. होती, तर मी आजच ती मिटवून टाकली.

## कॅनडात भारतीय विद्यार्थीनीचा गोळीबारात मृत्यू

### बस स्टॉपवर उभी असताना अचानक लागली गोळी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९हॅमिल्टन**

बस स्टॉपवर बसची वाट पाहत उभ्या असलेल्या २१ वर्षीय हरसिमरत रंधावा या विद्यार्थीनीचा कॅनडामध्ये मृत्यू झाला आहे. ओंटारिओमधील हॅमिल्टन बस स्टॉपवर उभी असताना बुधवारी सायंकाळी हरसिमरतला गोळी लागली. दोन वाहनातून एकमेकांवर गोळीबार करत असताना त्यापैकी एक गोळी निष्पाप हरसिमरतला लागली. ती मोहॉक महाविद्यालयात शिक्षण घेत होती. मागच्या चार महिन्यात कॅनडात भारतीय विद्यार्थ्यांचे मृत्यू होत असून हरसिमरत या चौथ्या विद्यार्थीनीचा आता मृत्यू झाला आहे.



हॅमिल्टन पोलीस सध्या या घटनेचा तपास करत आहेत. हरसिमरत रंधावाचा गोळीबाराच्या घटनेशी काही एक संबंध नव्हता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अप्पर जेम्स आणि साऊथ बेंड रस्त्यावर दोन वाहनातून एकमेकांवर गोळ्या झाडण्यात आल्या. यावेळी बस स्टॉपवर उभ्या असलेल्या हरसिमरतच्या छातीला गोळी लागली. यानंतर तिला जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, पण तोपर्यंत तिचा मृत्यू झाला होता. परिसरातील सीसीटीव्हीमध्ये दोन वाहनातून एकमेकांवर गोळीबार होत असल्याचे चित्रण हाती लागले आहे. गोळीबारात विद्यार्थीनीचा मृत्यू झाल्यानंतर दोन्ही वाहनांनी घटनास्थळावरून पळ काढला. या गोळीबारात परिसरातील एका घराच्या खिडकीलाही गोळी लागली. मात्र यात घरातील कुणालाही दुखापत झाली नाही.

सदर घटनेनंतर टोरंटोमधील वाणिज्य दुतावासाने शोक व्यक्त केला आहे. एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले, ओंटारियो येथे भारतीय विद्यार्थीनी हरसिमरत रंधावाच्या दुःखद मृत्यूमुळे आम्हाला तीव्र दुःख झाले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ती निष्पाप असून गोळीबाराशी तिचा काही एक संबंध नव्हता. हत्येचा तपास सुरू आहे. आम्ही हरसिमरतच्या कुटुंबियांशी संपर्कात आहोत. त्यांना आवश्यक ती सर्व मदत देण्यात येत आहे. या कठीण काळात शोकाकूल कुटुंबाबरोबर आहोत.

## जम्मू-काश्मीर आणि दिल्ली-एनसीआर मध्ये भूकंपाचे धक्के

### लोक कार्यालये आणि घरांमधून बाहेर पडले : भूकंपाचे केंद्र अफगाणिस्तान-ताजिकिस्तान सीमावर्ती भागात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नवी दिल्ली**

शनिवारी दुपारी १२:१७ वाजता अफगाणिस्तानात ५.८ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला. भूकंपाचे धक्के जम्मू-काश्मीर आणि दिल्ली-एनसीआरपर्यंत जाणवले. तथापि, अद्याप जीवित किंवा वित्तहानी झाल्याचे कोणतेही वृत्त नाही.




राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या म्हणण्यानुसार, भूकंपाचे धक्के जम्मू आणि काश्मीरच्या काही भागातही जाणवले. श्रीनगरमधील एका स्थानिक व्यक्तीने सांगितले- मला भूकंपाचे धक्के जाणवले. मी ऑफिसमध्ये होतो तेव्हा माझी खुर्ची हलली. काही भागात लोक घरे आणि कार्यालयांमधून बाहेर पळताना दिसले.राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्र (छउड) नुसार, भूकंप पृष्ठभागापासून ८६ किलोमीटर खाली झाला. त्याचा केंद्रबिंदू अफगाणिस्तान-ताजिकिस्तान सीमावर्ती भागात होता. हा भाग भूकंपाच्या दृष्टीने संवेदनशील मानला जातो. या भागात भूकंप होणे सामान्य आहे.१६ फेब्रुवारी रोजी सोमवारी पहाटे ५:३६ वाजता दिल्ली-एनसीआरमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. अडीच तासांनंतर, सकाळी ८ वाजता, बिहारमधील सिवानलाही भूकंपाचा धक्का बसला. दोन्ही ठिकाणी भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४ मोजण्यात आली. भूकंपाचे केंद्र नवी दिल्ली होते आणि त्याची खोली पाच किलोमीटर असल्याचे सांगितले जात आहे. नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजी (छउड) ने द या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ही माहिती दिली.

भूकंपाच्या जोरदार धक्क्यांमुळे दिल्ली, नोएडा, ग्रेटर नोएडा आणि गाझियाबादमधील लोक घाबरून घराबाहेर पडले. तथापि, आतापर्यंत कोणत्याही प्रकारची जीवित किंवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भूकंपाबाबत सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द वर ट्विट केले. त्यांनी लोकांना शांत राहण्याचे आवाहन केले. अधिकारी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत असेही त्यांनी सांगितले.

## राज आणि उद्धव ठाकरे युती करत असेल तर भाजप त्यांच्या युतीच्या मधात येणार नाही : महसूल मंत्री चंदशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

आमच्यातले (उद्धव ठाकरेंसोबतचे) वाद, भांडणं छोटी आहेत. महाराष्ट्र मोठा आहे. त्यामुळे एकत्र येणं, राहणं कठीण नाही, असं मोठं विधान मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी केलं आहे. मराठी दिग्दर्शक महेश मांजरेकर यांनी राज ठाकरेंची मुलाखत घेतली. या मुलाखतीमध्ये राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंसोबतच्या युतीवर भाष्य केलं आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात चर्चांना उधाण आले आहे.

शिवसेनेसोबत अजूनही एकत्र येऊ शकता का?, असा प्रश्न महेश मांजरेकर यांनी राज ठाकरेंना मुलाखतीमध्ये विचारला. यावर मराठी माणसाच्या अस्तित्वापुढं वाद भांडणं क्षुल्लक आहे. त्यामुळे एकत्र येणं आणि एकत्र राहाणं, यात काही मला कठीण गोष्ट आहे असं वाटत नाही. परंतु विषय फक्त इच्छेचा आहे. हा एकट्या माझ्या इच्छेचा विषय नाही आणि माझ्या स्वार्थाचाही विषय नाही, असं राज ठाकरेंनी उत्तर दिलं. राज ठाकरेंच्या या विधानानंतर राज्याचे महसूल मंत्री व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपली प्रतिक्रिया देत म्हणाले कि राज साहेबांना त्यांची भूमिका मांडवी व त्यांना कोणाशी युती करायची आहे हा सर्वाधिकार त्यांचा आहे.राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे युती करत असेल तर भाजप त्यांच्या युतीच्या मधात येणार नाही. राज ठाकरेंनी मोदींच्या लोकसभेच्या निवडणुकीत आम्हाला साथ दिली,त्यांनी चांगला निर्णय घेतला होत. विधानसभेत त्यांनी महायुती सोबत जमणार नाही असे सांगितले. त्यांनी काय कराव हा त्यांचा प्रश्न आहे



मराठी भाषेकरिता आम्ही सर्व एकत्र आहोत. राज साहेबांनी मागणी केल्याने मोदींनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला. त्यामुळे राज साहेबांनी मोदींच अभिनंदन केलं मराठी भाषा करिता आम्ही सर्व जीवाचं रान करणारे लोक आहोत असेही महसूल मंत्रीचंद्रशेखर बावनकुळे म्हणालेत. ते आज अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.

## मराठवाड्यातील आजच्या पिढीने दुष्काळ पाहिला, पुढच्या पिढीला पहावा लागणार नाही! मुख्यमंत्र्यांनी दिला शब्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९बीड**

समुद्रात वाहून जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात आणण्यासाठी योजनेला मंजूरी दिली आहे. त्याचा आराखडा तयार केला जात असून तो लवकरच तयार होईल. ५३ टीएमसी पाणी या योजनेतून गोदावरी खोऱ्यात आणण्यात येणार आहे. त्यामुळे मराठवाड्यातील मागच्या पिढीने दुष्काळ पाहीला असला तरी नव्या पिढीला तो पहावा लागणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. मराठवाड्याती संतांच्या आशीर्वादाने आपण लवकरच ही योजना पूर्ण करू, असे आश्वासनही फडणवीस यांनी दिले.

जिल्ह्यात घटशीळ पारगाव येथील गहिनीनाथ गडाच्या फिरत्या नारळी सप्ताह सांगता समारंभाला मुख्यमंत्री हजर होते. मंत्री पंकजा मुंडे यांच्यासह या सोहळ्या उपस्थित राहून त्यांनी बीड जिल्हा आणि मराठवाड्याती दुष्काळी परिस्थितीवर भाष्य केले. आमचा बीड जिल्हा सातत्याने दुष्काळाच्या झळा सोसत आहे. त्याला दुष्काळातून बाहेर काढण्यासाठी आपण प्रयत्न सुरू केला आणि मागच्या काळात आपल्या हक्काचं कृष्णेचं पाणी आष्टी पर्यंत पोहोचण्याचा निर्णय केला. ते पाणी आज आष्टीपर्यंत पोहोचले आहे.पण हे पाणी केवळ आष्टी पर्यंतच मर्यादित न ठेवता ते पुढे देखील आणून आख्या जिल्ह्याला पाणीदार करायचा आहे आणि तोच आमचा प्रण असल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले.



मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचे वर्णन करताना फडणवीस यांनी एक उदाहरण दिले. एका हौदामध्ये पाणी आहे आणि ते मागणारे अनेक जण. हौदातलं पाणी वाढत नाहीये, तर मागणाऱ्यांचे हात मात्र वाढत आहे. अशा परिस्थितीवर मात करण्यासाठीच आपण मराठवाड्यातील संतांच्या आशीर्वादाने समुद्राकडे वाहून जाणारे पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आणण्यासाठीच्या योजनेला मान्यता दिली आहे.

यातून ५३ टीएमसी पाणी आपल्याला मिळणार आहे. या योजनेचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. लवकरच ते पूर्ण होईल. कृष्णा वहिनीला जो पूर येतो त्या पुराचे पाणी आम्ही वर्ल्ड बँकेच्या माध्यमातून या भागात आणण्याच्या योजनेला मान्यता दिली आहे. सोबतच येत्या मे महिन्यात आम्ही त्याचे टेंडर देखील काढणार आहोत. त्यामुळे मराठावड्यातील आजच्या पिढीने दुष्काळ बघितला, मात्र पुढील पिढीला या भागात दुष्काळ बघायला मिळणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

## उद्धव-राज ठाकरे संभाव्य युतीवर नितेश राणेंची प्रतिक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

महाराष्ट्राच्या अस्तित्वासाठी, मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी ही भांडणं, वाद या गोष्टी अत्यंत क्षुल्लक आहेत. एकत्र येणं, एकत्र राहणं, यात कठीण गोष्ट आहे, असं मला वाटत नाही. पण विषय फक्त इच्छेचा आहे असं राज ठाकरे उद्धव ठाकरेंसोबत युती करण्याच्या मुद्यावर म्हणाले. त्यावर उद्धव ठाकरे यांनी सुद्धा मनसेसोबत युती करण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद दिला. 'मी सुद्धा भांडण बाजूला ठेवायला तयार आहे' असं उद्धव ठाकरे म्हणाले. दोन्ही बाजूंकडून आलेल्या या वक्तव्यानंतर आता ठाकरे गट आणि मनसे यांच्या युतीच्या चर्चा सुरु झाल्या आहेत. त्यावर आता नितेश राणे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.



मला एक कळत नाही याने काय फरक पडणार? दोघे एकत्र आले काय, किंवा नाही आले काय? महाराष्ट्रासाठी, हिंदुत्वासाठी कोणी एकत्र येतय का?. हा स्वतःच्या अस्तित्वासाठी एकत्र येण्याचा कार्यक्रम आहे अशी टीका नितेश राणे यांनी केली. उद्धव ठाकरे आतापर्यंत जिहाद्यांची बाजू घेत आलेत. आम्ही त्यांना जिहादीहृदयसम्राट बोलतो. म्हणूनच महाकुंभवर टीका करायची आणि उद्धव ठाकरे सारख्या जिहाद्याला खूश करायचं.

## संपादकीय ......

# काँग्रेस अधिवेशनाची फलश्रुती

ऐतिहासिक अहमदाबाद शहरात साबरमतीच्या काठी काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन पार पडले. तब्बल चौसष्ठ वर्षांनी गुजरातमध्ये काँग्रेस अधिवेशन झाले. गुजरात राज्य पक्षाच्या हातून गेल्याला आता तीन दशके झाली. सर्व देशभरातच काँग्रेसची स्थिती कमी-जास्त प्रमाणात खिळखिळी आहे आणि गुजरात त्याला अपवाद नाही. तथापि, महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, दादाभाई नौरोजी यांचा वारसा आपल्याकडे असल्याचा काँग्रेसचा दावा असतो. त्या भावनिकतेतून यंदाचे अधिवेशन साबरमतीच्या काठी घ्यायचा विचार झाला असावा; पण प्रतीकात्मकतेशिवाय त्याला व्यवहारात फारसे महत्त्व नाही.

अधिवेशनात जे काही विचारमंथन झाले, त्यातून पक्षाला काही संदेश मिळाला का आणि भावी वाटचालीसाठी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन मिळाले का, हा खरा प्रश्न! त्याचे उत्तर फार समाधानकारक नसल्याचेच अधिवेशनाच्या आढाव्यातून दिसून येते. अधिवेशनाची एक औपचारिकता पार पडली, एवढे म्हणता येईल.पक्षाध्यक्ष खर्गे यांनी वेगळा मुद्दा मांडला, तो म्हणजे जिल्हाध्यक्षांना अधिक महत्त्व आणि अधिकार देण्याचा. काँग्रेस पक्षात जिल्हा समितीने प्रदेश समितीकडे उमेदवारांची नावे पाठवावीत, एवढेच आजवरचे जिल्हा समितीचे कामकाज. आपण निवडलेल्या उमेदवारासाठी आग्रह धरण्याचा अधिकार कधी जिल्हा पातळीवर मिळाला नाही. आता खर्गे यांच्या म्हणण्यानुसार, जिल्हाध्यक्ष सक्षम करण्यात येत असतील, तर पक्ष संघटनेला उजाळा मिळायला मदतच होईल; पण हे जिल्हाध्यक्ष पुन्हा कोणाचे तरी 'होयबा' असतील, तर मात्र 'पहिले पाढे पंचावन्न' असेच होणार.

आजवर पक्षश्रेष्ठींपुढे 'जी हुजूर' म्हणून लोटांगण घालणारे अनेक मुख्यमंत्री अनेक राज्यांत झाले आणि त्याचा अंतिम परिणाम पक्ष संघटनेवर झाला. जनाधार असलेले नेते संघटनेतून खड्यासारखे फेकले गेले. 'होयबां'ची वर्णी लागल्यावर संघटनेची घसरण झाली, यात आश्चर्य नाही. जिल्हाध्यक्षांना अधिक अधिकार देण्यातून संघटना ऊर्जितावस्थेला यायला मदत होऊ शकेल; पण ही प्रक्रिया गुणवत्तेला प्राधान्य देऊन होण्याची गरज आहे. मुंबई महानगरात विधानसभेचे ३६ मतदारसंघ आहेत. प्रत्येक मतदारसंघाला एक मंडल अध्यक्ष असे. आता यापुढे तीन मंडल अध्यक्ष राहतील. प्रतिस्पर्धी पक्षाच्या अशा हालचालींतून काँग्रेस पक्षाने बोध घेणे जरुरीचे आहे; पण पक्ष संघटना मजबूत करण्याबाबत खर्गे यांच्या दोन सूचना वगळता फारशी चर्चा झाली नाही.

ज्यांना जबाबदारी घ्यायची नाही, त्यांनी निवृत्त व्हावे,' ही खर्गे यांची दुसरी सूचना. ही सूचना खरोखर गांभीर्याने घेतली गेली, तर पक्षातील जागा अडवून राहिलेल्यांच्या जागी नवे चेहरे येऊ शकतील. पक्षात थोडाफार बदल जाणवेल; पण 'मांजराच्या गळ्यात घंटा बांधणार कोण?' हा खरा यक्षप्रश्न आहे. खर्गे यांची सूचना चांगली; पण ती कितपत अंमलात येईल, हे सांगणे कठीण. कन्हैयाकुमार, सचिन पायलट, गौरव गोगोई, इम्रान प्रतापगढी आदींनी भाजपवर टीकास्त्र सोडले, तर शशी शरूर यांनी काँग्रेसने राष्ट्रवादासारखा मुद्दा मांडला पाहिजे, असे सांगत फक्त भाजपवर टीका करून फायदा नाही, असे सुनावले. उशिरा का होईना; पण पक्ष संघटनेकडे लक्ष देण्याचे, संघटना बळकट करण्याचे शिवधनुष्य उचलण्याचा निर्णय झाला आहे.

भाजपने महाराष्ट्रात दीड कोटी सदस्य नोंदणी केली आहे. राज्यात मतदारसंख्या आहे, ९ कोटी २३ लाख. म्हणजे त्यापैकी भाजप सदस्य १५ टक्के आहेत. हे भाजपचे हक्काचे मतदार. शिवाय, भाजपला मानणारे वेगळे. एवढ्या जोरावर पुढच्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजप १३२ आमदारांवरून स्वबळावर सत्ता मिळवू शकतो. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला २७ टक्क्यांपर्यंत मते मिळाली होती, तर काँग्रेस पक्षाला १२.१९ टक्के मतदान मिळाले होते. ही तफावत मोठी आहे. ती भरून काढायची, तर पक्षाला आणि नेतृत्वाला परिश्रमाशिवाय पर्याय नाही.


जात-धर्म यात तेढ निर्माण न करता, राष्ट्रवादाचा समावेश पक्षाच्या ठरावात करण्यात आला, ही पक्षाची महत्त्वाची चाल. राष्ट्रवाद हा आपलाच मुद्दा, या भाजपच्या भूमिकेला या ठरावाने काँग्रेस पक्ष शह देऊ शकतो आणि राष्ट्रवादाकडे ज्यांची मानसिकता त्यांना आपल्याकडे आकर्षित करू शकतो. अर्थात, हा दीर्घ पल्ल्याचा मार्ग आहे व त्यातील हे पहिले पाऊल आहे.१९६९ ला काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षाचे अधिवेशन मुंबईत १९६९ च्या डिसेंबरात भरले होते, तेव्हा यशवंतराव चव्हाण यांनी मावळत्या सूर्याला साक्षी ठेवून तमाम महाराष्ट्र इंदिराजींच्या पाठीशी असल्याची जाहीर ग्वाही दिली होती आणि आर्थिक ठराव मांडला होता. त्यातूनच पुढे इंदिराजींनी 'गरिबी हटाव' अशी ऐतिहासिक घोषणा करून १९७१ ची लोकसभा निवडणूक जिंकली होती.

'संविधान बचाव'सारख्या प्रश्नावर रस्त्यावर उतरण्याची भाषा झाली, ती योग्यच. 'नॅशनल हेराल्ड' प्रकरणात श्रीमती सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांना 'ईडी'ने नोटिसा जारी केल्या आहेत. त्याविरोधात मुंबई, दिल्ली आदी ठिकाणी काँग्रेस कार्यकर्त्यांनी निदर्शने केली. त्याबद्दलही आक्षेप घ्यावा, असे नाही; पण जनसामान्यांच्या थेट प्रश्नांवर, समस्यांवर कार्यकर्त्यांनी रान उठवले पाहिजे, असा ठोस संदेश आणि आदेश ठामपणाने यावयास हवा होता, तसे दिसले नाही. केंद्रात गेल्या तीन लोकसभा निवडणुकांपासून काँग्रेस पक्ष सत्ता मिळवू शकलेला नाही. १९८९ पासून पक्षाने स्वबळावर सत्ता मिळवलेली नाही. एका हाताच्या बोटावर मोजता येतील, एवढ्या राज्यांत काँग्रेसची सत्ता आहे. या अधिवेशनापासून पक्षाला थोडी नवसंजीवनी मिळाली, तरी अहमदाबाद अधिवेशन ऐतिहासिक अधिवेशन ठरू शकेल.'नॅशनल हेराल्ड' चालविणार्या संस्थेवर श्रीमती सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी ताबा घेतल्याचे प्रकरण गंभीर वळणावर जाण्याची शक्यता बोलली जात आहे. १९३८ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांनी 'नॅशनल हेराल्ड' या वृत्तपत्राची स्थापना केली. काँग्रेस पक्षाचे मुखपत्र म्हणून त्याकडे पाहिले जाई. २००८ मध्ये हे वृत्तपत्र बंद पडले. असोसिएट जर्नल लि. (एजेएल) या संस्थेमार्फत हे वृत्तपत्र चालवले जाई. २०१० मध्ये यंग इंडिया लि. अशी कंपनी स्थापन करण्यात आली.

# उन्हाळ्यात वेलवर्गीय भाजीपाला पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव अशी घ्या काळजी

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक**

वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये काकडी, कारली, दुधी भोपळा, घोसाळी, दोडका,



**विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष**

पडवळ यांचा समावेश होतो. एप्रिल महिन्याचा उन्हाचा कडाका वाढत असल्याने अनेकदा रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो. उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता असते. अशावेळी नेमकी कशी काळजी घ्यायची हे जाणून घेऊयात...

काळा करपा, केवडा (डाऊनी मिल्ड्यू) रोगांचा प्रादुर्भाव दिसून आल्यास, नियंत्रणासाठी अमिटोक्ट्रॅडीन (२७%) + डायमिथोमॉर्फ (२०.२७% एससी) २ मिली किंवा बेनालॅक्सिल (४%) + मॅन्कोझेब (६५% डब्लूपी) २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकतेनुसार पुढील फवारणी १० दिवसांच्या अंतराने करावी.जिवाणूजन्य करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास, नियंत्रणासाठी कॉपर ऑक्झिक्लोराइड (५० डब्ल्यूपी) २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारावे.

**पाणी व्यवस्थापन**उन्हाळी हंगामात भाजीपाला लागवडीमध्ये सिंचनाचे काटेकोर नियोजन करणे अत्यंत आवश्यक असते. सिंचन व्यवस्थापन करताना जमिनीचा मगदूर, पिकाची वाढीची अवस्था या गोष्टी विचारात घ्याव्यात. उन्हाळी हंगामात पाणी व्यवस्थापन करताना ठिबक सिंचन, तुषार सिंचन पद्धतीचा अवलंब केल्यास कमी पाण्यात चांगले उत्पादन मिळू शकते.

तसेच प्लॅस्टिक आच्छादनाचा वापर केल्यास बाष्पीभवन कमी होण्यास मदत होते. पाण्याची बचत करणे शक्य होते. विशेषतः फुलधारणा ते फळे काढणीच्या काळात एकसारखा पाणीपुरवठा करणे आवश्यक आहे.

शक्यतो सकाळी, संध्याकाळी अथवा रात्रीच्या वेळी सिंचन करावे. भर उन्हात दुपारी सिंचन करणे टाळावे.

-ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी


शेतकरी ते थेट ग्राहक

**कामधेनु नॅचरल्स**

उत्तम आहार सर्वोत्तम जीवन

विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी

समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती

नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०






## सतत पाय हलवता का? नखे खाण्याची सवय आहे? दुर्लक्ष करु नका पाहा मानसशास्त्र काय सांगते

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक**

आपल्याला अशा अनेक सवयी असतात ज्या फार साध्या वाटतात. त्या आपल्या वागण्याचा भाग होऊन जातात. त्यांचा आपण कधी फार विचार वगैरे करत नाही. प्रत्येक सवय काही तरी सुचित करते असे नाही, मात्र काही सवयी असतात ज्या काही त्रासांबद्दल किंवा इतर कोणत्या गोष्टींबद्दल सुचित करतात. या सवयी आपल्याला पटकन ओळखता येत नाहीत.



हातांच्या हालचाली असतात, तसेच पायांच्या हालचाली असतात. डोळे मिचकवायची सवय असते. काहींना स्थिर स्तब्ध बसताच येत नाही. या सवयी काही तर दर्शवत असतात असे मानसशास्त्र सांगते. 'एनआयएच' तसेच 'मेडीकल न्यूज टुडे' सारख्या साईट्सवर या बद्दल माहिती उपलब्ध आहे.

अशीच एक सवय असते ती म्हणजे बसल्याबसल्या किंवा उभ्याउभ्या पाय हलवायची. काम करताना तसेच जेवतानाही काही लोक सतत पाय हलवत असतात. तज्ज्ञ सांगतात, याची अनेक कारणे आहेत. त्यापैकीच एक म्हणजे एंग्झायटी. आजकाल याचे प्रमाण फार वाढले आहे. हा काही आजार नाही. मात्र वेळीच काळजी घेतली नाही तर त्याचे परिणाम फार वाईट होऊ शकतात. तसेच काही जण ओव्हर्थिंकींग करतात. त्यामुळेही शरीर गरजेच्या नसलेल्या हालचाली करायला लागते. डोक्यामध्ये विचारांचा कल्लोळ झाला असेल तरी अशा सवयी माणसाला लागतात. या मानसिक स्थितींना अनेक विविध प्रकारची नावे मानसशास्त्रामध्ये आहेत.

एखाद्या प्रसंगी काय करावे हे सुचत नसेल की पाय अपोआप हलायला लागतो. कारण डोक्यामध्ये गोंधळ उडाला असतो. या सवयी फार कॉमन आहेत. काम करताना लक्ष कामात असले तरी पायाची हलचाल चालूच असते. त्याचे कारण मनाच्या कोपऱ्यामध्ये काही तरी सुरूच असते. ज्याचा ताण डोक्यावर येत असतो. 'पाय हलवायची सवय वाईट आहे, त्याने दारिद्र्य येते' असे म्हणण्याची आपल्याकडे पद्धत आहे. मात्र त्यामागील खरे कारण हे असते.

# चार वर्षांखालील मुलांसाठी 'या' खोकल्याच्या सिरपवर आता बंदी




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९नवी दिल्ली-** केंद्र सरकारने नुकतीच एक महत्त्वाची घोषणा करत चार वर्षांखालील मुलांसाठी काही विशिष्ट खोकल्याच्या सिरप्सचा वापर बंद केला आहे. ही कारवाई मुलांच्या सुरक्षेचा मुद्दा लक्षात घेत करण्यात आली आहे. तसेच, औषध नियंत्रण प्राधिकरणाने औषधांच्या लेबलेवर आणि पॅकिंगवर स्पष्ट चेतावणी लिहिण्यास सांगितले आहे.

या निर्णयामागे मुलांच्या सुरक्षेचा मुद्दा असून, औषधांमध्ये वापरण्यात येणाऱ्या क्लोरफेनिरामिन मालेएट आणि फेनिलएफ्रिन हायड्रोक्लोराइड या संयुगांमुळे धोका निर्माण होऊ शकतो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळे अशा औषधांवर 'चार वर्षांखालील मुलांसाठी वापर निषिद्ध' अशी स्पष्ट चेतावणी लेबल आणि पॅकेजवर देणे आता बंधनकारक करण्यात आले आहे.

या निर्णयामुळे अ‍ॅस्कोरिल, अ‍ॅलेक्स, टी-मिनिक यासारख्या OTC (ओवर-द-काउंटर) सिरप्सवर प्रभाव पडणार आहे. लहान वयातील मुलांसाठी औषध वापरण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यंत आवश्यक आहे. जढउ औषधे सुरक्षित वाटली तरी ती वय, वजन आणि स्थितीप्रमाणे अपायकारक ठरू शकतात.

**कोणत्या औषधांवर बंदी? -**

Ascoril Flu Drops
Alex (Glenmark)
TAMinic (Haleon)
Maxtra (Zuventus Healthcare)

केंद्र सरकारने १५ एप्रिल २०२५ रोजी अधिसूचना जारी करत काही विशिष्ट FDC (Fixed Dose Combination) औषधांच्या वापरावर बंदी घातली आहे. ही औषधे अनेक प्रसिद्ध ब्रँड नावांखाली जढउ स्वरूपात डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय बाजारात विकली जातात. ही औषधे सामान्यतः सर्दी, खोकला आणि अ‍ॅलर्जीवर वापरली जातात, पण आता ४ वर्षांखालील मुलांसाठी ती धोकादायक असल्याचे समोर आले आहे.

या औषधांमध्ये chlor pheniramine male- ate AmU phenyle- phrine hydrochlo- ride हे घटक असतात, जे अनेकदा सर्दी आणि अ‍ॅलर्जी वर उपचारासाठी वापरले जातात. आता हे सर्व Fixed Dose Combination (FDC) प्रकारात ली ही औषधे वापरण्यावर तसेच, उत्पादन करणे व विक्री करणे यावर बंदी घालण्यात आलेली आहे.

# कुख्यात गुंडांची तयार होत आहे यादी २२ पासून पोलीस आयुक्तांसमोर पेशी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती**

शहरात नुकत्याच झालेल्या तीर्थ वानखडे हत्याप्रकरणाच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यासाठी आता प्रत्येक पोलीस ठाणेनिहाय टॉप १० व टॉप २० गुन्हेगारांची यादी तयार करण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. येत्या २२ एप्रिलपासून पोलीस - आयुक्तांसमोर या गुंडांची पेशी होणार आहे. स्थानिक रवीनगर परिसरात तीर्थ वानखडे या युवकाची दोन दिवसांपूर्वीच गटबाजीतून हत्या करण्यात आली. याप्रकरणातील आरोपींविरूध्द कठोर कारवाईच्या मागणीसाठी तीर्थ वानखडेच्या समर्थकांकडून राजापेठ पोलीस ठाणे आणि पोलीस आयुक्त कार्यालयात मोर्चा काढण्यात आला. आठ दिवसांपूर्वी मसानगंज परिसरात एकायुवकाची हत्या करण्यात आली.

यासोबतच लुटमारीच्याही घटना घडल्या. गुन्हेगारी घटनांच्या या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त डॉ. नवीनचंद्र रेड्डी यांनी गुन्हे शाखेचे विविध तीन पथक तयार केले आहे. पोलीस ठाणेनिहाय गुन्हेगारांची यादी तयार करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार पोलीस अधिकारी-कर्मचारी कामाला लागले आहेत. या याद्या तयार झाल्यानंतर २२ एप्रिलपासून येथील वसंत हॉल येथे पोलीस आयुक्तांसमोर गुन्हेगारांना हजर केले जाणार आहे. गुन्हेगाराविरूध्द किती गुन्हे व गुन्ह्याचे प्रकार, ते काय करीत आहेत, याबाबतची चौकशी पोलीस आयुक्तांकडून केली जाणार आहे. सण-उत्सव व मंत्र्यांचे दौर आटोपल्यानंतर पोलिसांनी गुन्हेगारांकडे आपले लक्ष केंद्रीत केले आहे.

# घरकुल निर्मितीत अकोला जिल्हा राज्यात दुसरा

## १०० दिवसीय कार्यक्रमात उद्दिष्टापेक्षा ८३ टक्के अधिक काम



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अकोला-** ग्रामीण गृहनिर्मिती १०० दिवसांचे उद्दिष्ट पूर्ण करून अकोला परिणामाने पुढील क्रमांक पटकावला आहे. उद्दिष्टाच्या १८३ टक्के काम पूर्ण चार हजारावर घरकुले केले आहेत.दिवसाच्या १ राज्य शासन कार्यक्रमात महाअभियान राबविण्याची प्रभावी अंमलबजावणी ० सदस्यांचे दोन हजार ५१६ उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. ग्रामीण आश्रयस्थानांच्या दुस-या चतुर्थी चाचणी २७ हजार ४१३ लाभार्थी घरकुल लाभपत्र व २१ हजार ६२ सदस्यांना हप्त्याचे राज्याचे अधिकारी तथा पालक मंत्री. आकाश फुंडकर यांचे वजन होते. महावास उत्तराधिकारी घर पूर्ण करून गरजूंना शोधून निर्देश पालक लाभनी दिले होते. तीव्र गतीने राबता आली.

या कार्यक्रमासाठी घरकुल देण्यासाठी, प्रथम आठवडा खुला करणे, घरकुलासाठी जागा उपलब्ध करणे, घरकुल पूर्ण करणे असे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. प्रशासनासाठी कामाला गती देत उद्दिष्टापलीकडे एकूण ४ हजार ६०० घरकुले पूर्ण करण्यात आली. ग्रामीण भागातील ग्रामीण गृहनिर्माण संचालक कार्यालय जिल्हा प्रशासन, जिल्हा प्रशासन व जिल्हा ग्रामीण विकास प्राधिकरणाचे अभिनंदन करण्यात आले.राज्य रत्नागिरी पोलीसने प्रथम व अकोला पक्षाने क्रमांक पटकावला आहे. घरकुल एकार्थी हक्काचे घर आणि त्यांचे लाभार्थी जीवनमान सुरक्षित करण्यासाठी स्थिर मदत होणार आहे. पालक मंत्री ड. आकाश फुंडकर, अजित कुंभार, मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी, कार्यप्रणाली मुख्याधिकारी आणि मुख्याधिकारी मेश्राम मार्गदर्शक संचालक मनोज जाधव, जिल्हा जिल्हा अधिकारी, जिल्हा विकास अधिकारी, विस्तार अधिकारी पंचायत, घरकुल अधिकारी गावस्तरावर सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी आणि ग्रामीण अभियांता, विकास सेवक परिश्रम घेत आहेत.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucngmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १९ एप्रिल २०२५

शहर/ग्रामिण


# शहरात वर्षभरात वाहनचालकांवर आकारला ८ कोटी ९१ लाखांचा दंड

## केवळ ८६ लाख ३४ हजार रुपयांचा दंड वसूल ८ कोटी ५ लाख रुपयांची थकबाकी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती-** वाहतूक नियमांचे उल्लंघन करणार्यांवर ई-चलनाद्वारे दंड आकारण्यास पोलिसांनी सुरुवात केली असली तर वाहनचालकांनी मात्र असा दंड भरण्याकडे पाठ फिरवली आहे. अमरावती शहरात वर्षभरात वाहनचालकांवर ८ कोटी ९१ लाखांचा दंड आकारण्यात आला होता. मात्र केवळ ८६ लाख ३४ हजार रुपयांचा दंड भरण्यात आला असून ८ कोटी ५ लाख रुपयांची थकबाकी आहे.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणार्या वाहनचालकांवर पूर्वी पावती फाडून रोख रकमेच्या स्वरूपात दंड आकारला जात होता. त्यामुळे वाया जाणारा वेळ, भ्रष्टाचार तसेच वाद टाळण्यासाठी ई-चलन पद्धत अमलात आणण्यात आली. या पद्धतीत नियमांचे उल्लंघन करणार्या वाहनचालकांचे फोटो काढून दंडाची रक्कम त्यांच्या मोबाइलवर आणि



घराच्या पत्त्यावर पाठवली जाते.

अमरावती शहरात बेलगाम वाहतुकीवर अंकुश लावण्यासाठी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या मार्गदर्शनात वाहतूक शाखेकडून विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत. परंतु, नियमबाह्य वाहतुकीचा दंड भरण्यास वाहन चालक दुर्लक्ष करीत असल्याचे आकडेवारीतून दिसून येत आहे.८४ हजार २३९ वाहनांवर ८ कोटीचा दंड थकीत

अमरावती शहर वाहतूक शाखेच्या पूर्व व पश्चिम झोन मिळून दीडशेवर वाहतूक पोलिसांकडे वाहतूक नियंत्रणाची जबाबदारी आहे. तसेच नियमबाह्य वाहतुकीवर पोलीस यंत्रणा सातत्याने लक्ष ठेऊन आहे. १ जानेवारी ते ३१ डिसेंबरपर्यंत वाहतूक विभागाने विविध नियमांचे उल्लंघन करणार्या तब्बल ९३ हजार ५४१ वाहनांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. यामधून ८ कोटी ९१ लाख ७१ हजार ८५० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. यापैकी ९ हजार २५५ वाहनांच्या चालकांनी ८६ लाख ३४ हजार १५० रुपयांचा दंड भरलेला आहे. परंतु, अजूनही यामध्ये ८४ हजार २३९ वाहनांच्या चालकांनी ८ कोटी ५ लाख ३७ हजार ७०० रुपयांचा दंड भरलेला नाही. अमरावती जिल्हा ग्रामीण भागात १ डिसेंबर २०२४ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत ई-चालान प्रकरणांमध्ये १ कोटी ७१ लाख ९१ हजार १०० रुपयांचा दंड, तर नियमीत प्रकरणांमध्ये ६१ लाख १९ हजार ५०० रुपयांचा दंड असा एकूण २ कोटी ४४ लाख १८ हजार ६०० रुपयांच्या दंडाचा वाहन चालकांकडून भरणा करण्यात आलेला आहे. तसेच १३८ वाहनधारकांविरुध्द न्यायालयीन खटले दाखल करण्यात आले आहेत. दंड न भरणार्या चालकांची वाहने न्यायालयाच्या परवानगीने जप्त करण्याची मोहीम पोलिसांनी सुरु केली आहे.

# पीककर्जासाठी पाचशे रुपयांच्या स्टॅम्पचीच सक्ती का हो साहेब ?

## आर्थिक भुर्दंड : संमतीपत्राला हवा पाचशे रुपयांचा स्टॅम्प

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती**

निसर्गाच्या लहरीपणामुळेच शेतकर्यांना नेहमी अस्मानी सुलतानी संकटाचा सामना करावा लागतो. त्यामुळे शेतकरी दिवसेंदिवस अडचणीत सापडत आहे. शेतकर्यांनी दरवर्षीच कर्ज काढून महागडे बी-बियाणे व कीटकनाशक घेतो, कर्जाच्या





शेतकरी नेहमीच संकटाचा सामना करतो. शेतकर्यांना संमतीपत्रासाठी लागणार्या त्यांच्या किमतीत शासनाने वाढ केल्याने शेतकर्यांना आर्थिक भुर्दंड बसत आहे. शासनाचे धोरण चुकीचे असून शेतकर्यांसाठी मारक आहेत. त्यामुळे फेरविचार करून स्टॅम्प ड्युटी माफ करावी.



**प्रकाश साबळे, युवा शेतकरी**

भरोशावरच शेतकरी खरिपाचे नियोजन करतात. मार्च संपल्याबरोबर शेतकरी कर्ज प्रकरणात गुंतल्याचे चित्र आहे. मात्र यावर्षी शेतकर्यांना पीककर्जासाठी शंभर ऐवजी पाचशे रुपयांचा स्टॅम्प लागणार आहे. ही सक्ती का, असा प्रश्न शेतकर्यांना पडला आहे. यामुळे शेतकर्यांना अतिरिक्त भुर्दड सहन करावा लागत असल्याने शेतकर्यांमध्ये संताप व्यक्त केल्या जात आहे.शासनाने निवडणुकांपूर्वी जाहीरनामा व भाषणात विविध आमिष दाखविले. या आमिषांना जनता बळी पडली. परिणामतः महायुती सरकार सत्तेवर आले. त्यामुळे शेतकर्यांच्या समस्या सुटून 'अच्छे दिन' येतील असे वाटायला लागले होते. मात्र तसे होताना दिसत नसल्याने निवडणुकांमध्ये दिलेली आश्वासने ही पोकळ असून हवेत विरणारी असल्याचे आता स्पष्ट होत आहे. त्यामुळे शेतकर्यांची कर्जमाफी, पीक विमा, खतांच्या वाढलेल्या किमती, सिलिंडरचे वाढलेले दर, बी-बियाण्यांच्या वाढलेल्या किमती या समस्या शेतकर्यांसमोर आवासून उभ्या आहेत. असे असतानाच पीककर्जासाठी स्टॅम्प पाचशेचा घ्यावा लागत असल्याने शेतकरी हवालदिल दिसत आहे.



# काकरमल-दुनी जंगलात भीषण अग्नितांडव

## शेकडो झाडे जळाली, गवत शंभर टक्के खळून खाक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९धारणी –** धारणी वन परीक्षेत्रातील दुनी व काकरमल गावा लगतच्या वन विभागाच्या जंगलात गुरूवारी सायंकाळी लागलेल्या आगीत अनेक वनस्पती व गवत जळाल्याने एकच खळबळ माजलेली होती. धावपळ करून धारणी रेंजच्या कर्मचार्यांनी आगीवर नियंत्रण मिळविले.धारणी पासून १६ कि.मी अंतरावरील प्रादेशिक वन विभागाच्या दुनी आणि काकरमल गाव शिवाराच्या जंगलात १७एप्रिलच्या सुर्यास्ताला आग लागून शेकडो झाडे जळाली, तर गवत पण शंभर टक्के खळून खाक झाले.

आग इतकी भयंकर होती की दुनी गावातून जंगल धो-धो जळतांना दिसत होते. आदिवासींनी आगीचे लाईव्ह फोटो पण काढले. धारणीच्या रेंजर पुष्पा सातारकर यांना माहिती समजताच विशेष पथक मोक्यावर पाठविण्यात आले. वनमजुर, वनपाल, वनरक्षक आणि दैनिक मजूरांनी कसोटीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळविले. यावेळी ब्लोअर मशीनचा पण योग्य उपयोग करण्यात आला.धारणीचे तापमान आता ४१ पर्यंत उच्चांक गाठत असल्याने आग लागण्याच्या घटना जंगलात वाढण्याची शक्यता आहे. म्हणून वन विभागाने सतर्क व ॲक्शन मोडवर राहण्याची गरज आहे. गावखेड्यातील नागरिकांनी जंगलात आग दिसताच धारणी रेंज कार्यालय आणि जवळच्या वनकर्मचाऱ्यांना सुचना द्यावी, अशी विनंती रेंजर सातारकर यांनी केलेली आहे.

# चिखलदरा आणि धारणी तालुक्यात नोव्हेंबर २०२४ मध्ये

## मेळघाटात दहा हजारांवर बालके कुपोषित?

**सात महिन्यात ४९ उपजत मृत्यू समोर माहिती अधिकारातून धक्कादायक आकडेवारी समोर**



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती**

बालकांचे कुपोषण दूर करण्यासाठी प्रत्येक वर्षी केंद्र वराज्य सरकार कोट्यवधींचा खर्चकरते. परंतु, त्यानंतरही जिल्ह्यातील मेळघाटया अतिदुर्गम आदिवासी भागातील चिखल दरा आणि धारणी तालुक्यात नोव्हेंबर २०२४ मध्ये १० हजारावर बालके कुपोषित असल्याचे माहिती अधिकारातून समोर आले आहे. सामाजिक कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी ही माहिती मागितली होती. जिल्हा परिषद अमरावती आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, नोव्हेंबर २०२४ मध्ये धारणी तालुक्यात एकूण २० हजार ३८० बालकांपैकी (शून्य ते पाच वर्षे वयोगट) १४ हजार १२६ सर्वसाधारण वजन व उंचीची होती. हजार ९६४ बालके कमी वजनाची तर ४ १ हजार २९० बालके तीव्र कमी वजनाची अशी एकूण ६ हजार २५४ बालके कुपोषित होती. चिखलदरा तालुक्यातील १३ हजार ९६४ बालकांपैकी ९ हजार ८६० बालके सर्वसाधारण वजन व उंचीची तर ३ हजार ३१६ बालके कमी वजनाची, ७८८ बालके तीव्र कमी वजनाची अशी एकूण ४ हजार १०४ बालके कुपोषित होती. दरम्यान, कुपोषणावर नियंत्रणासाठी आरोग्य विभागाकडून धारणी येथील उपजिल्हा रुग्णालय, चिखलदरातील चूर्णितील ग्रामीण रुग्णालय, ११ प्राथमिक आरोग्य केंद्र, ६ प्राथमिक आरोग्य पथके, ७फिरत्या आरोग्य पथकांसह इतरही यंत्रणांमार्फत उपचार व उपाय केले जात असल्याचे जिल्हा परिषद अमरावती कडून स्पष्ट करण्यात आले.या विषयावर जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागाचे जन माहिती अधिकारी राजेशरोंगे यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता संबंधित विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार ही आकडेवारी दिल्याचे त्यांनी सांगितले. सामाजिक कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी ही माहिती मागितली होती.

### सात महिन्यात ४९ उपजत मृत्यू

मेळघाटमध्ये २०२१-२२मध्ये ११३ उपजत मृत्यू (गर्भातच बाळाचा मृत्यू), २०२२-२३ मध्ये ७९ मृत्यू, २०२३-२४ मध्ये ७२ मृत्यू, तर एप्रिल-२०२४ ते ऑक्टोबर २०२४ दरम्यान सात महिन्यात ४९ उपजत मृत्यू झाल्याचेही माहिती अधिकारातून पुढे आले. या भागात २०२१-२२ मध्ये ५ मातामृत्यू, २०२२-२३मध्ये ३ मृत्यू, २०२३-२४मध्ये ५ मृत्यू तर एप्रिल-२०२४ ते ऑक्टोबर २०२४ दरम्यान येथे १ मातामृत्यू झाले.-

# सोयाबीनला उठाव ; पहिल्यांदा ४३०० पार

**विदर्भ प्रजासत्ताक-दि.१९अमरावती :** आंतरराष्ट्रीय बाजारात सोयापेंडचे (डीओसी) दर ३३०० रुपये क्विंटलवर पोहोचले आहेत. त्यामुळे सोयाबीनची दरवाढ झाली तर प्लॉन्ट खरेदीचे भाव त्यापेक्षा जास्त आहेत. मात्र, बाजारात सोयाबीनची आवक कमी असल्याने पहिल्यांदा ४३०० रुपये पार झालेले आहे. येथील बाजार समितीत गुरुवारी ३९३२ पोत्यांची आवक झाली.नाफेडच्या केंद्रांवर सोयाबीन खरेदीची मंदगती असल्याने दीड हजारावर शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी बाकी राहिली व केंद्र बंद करण्यात आली. त्यामुळे त्यातच खासगी बाजारात सोयाबीनचे दर ३९०० रुपये क्विंटलवर



स्थिरावल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अशा परिस्थितीत दरवाढीच्या प्रतीक्षेत काही शेतदस्यांनी सोयाबीनची साठवणूक केली.दरम्यान, आंतरराष्ट्रीय बाजारात सोयापेंडच्या दरात वाढ झाली आहे. यापूर्वी डीओसीचे दर २७०० ते २८०० रुपयांवर होते, ते या आठवड्यात ३२०० ते ३३०० रुपयांवर पोहोचले आहेत.


# मला झालेला आजार हा अर्धांगवायू नसून...;

## मंत्र्यांचा दावा खोडत धनंजय मुंडेंनी प्रकृतीबाबत केला खुलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९मुंबई –** राष्ट्रवादीचे नेते आणि आमदार धनंजय मुंडे हे मागील काही दिवसांपासून आजारपणाने ग्रस्त आहे. आपल्याला बेल्स पाल्सी हा आजार झाल्याचं त्यांनी महिनाभरापूर्वी स्पष्टही केलं होतं. मात्र काल धनंजय मुंडे यांचे पक्षातील सहकारी आणि राज्याचे मंत्री बाबासाहेब पाटील यांनी मुंडे यांना अर्धांगवायूचा झटका झाल्याचं सांगितलं आणि मुंडे समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे यांनी पाटील यांचा दावा खोडत पुन्हा एकदा आपल्या आजारपणाबाबत माहिती दिली आहे.

धनंजय मुंडे यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, आमचे सहकारी, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी केलेल्या एका विधानावरून मला अर्धांगवायू झाल्याचे वृत्त काही वाहिन्यांवर प्रसारित केले जात आहे. मुळात मला बेल्स पाल्सी हा आजार दीड महिन्यांपूर्वी झालेला असून त्याचा परिणाम चेहऱ्यावर झाल्याने अजूनही मला बोलायला त्रास होतो.बाबासाहेब पाटील यांची व माझी दोन दिवसांपूर्वी एका बैठकीत भेट झाली होती. त्यांनी माझ्याबद्दल काळजी व्यक्त केली त्याबद्दल आभार.मात्र मला झालेला आजार हा अर्धांगवायू नसून बेल्स पाल्सी आहे व त्याचा व इतर काही वैद्यकीय बाबींचा त्रास अजूनही होत असून बोलायलाही त्रास होत आहे, असा खुलासा मुंडेंनी केला आहे. मागील काही दिवसांपासून आजारपणाने ग्रस्त आहे. आपल्याला बेल्स पाल्सी हा आजार झाल्याचं त्यांनी महिनाभरापूर्वी स्पष्टही केलं होतं. मात्र काल धनंजय मुंडे यांचे पक्षातील सहकारी आणि राज्याचे मंत्री बाबासाहेब पाटील यांनी मुंडे यांना अर्धांगवायूचा झटका झाल्याचं सांगितलं आणि मुंडे समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, भगवानगडाच्या नारळी सप्ताहाच्या सांगता सोहळ्याच्या निमित्ताने धनंजय मुंडे हे गुरुवारी बीड जिल्ह्यातील शिरूर कासार येथे उपस्थित राहणार होते. परंतु धनंजय मुंडेंचा हा दौरा अचानक रद्द करण्यात आला. काही तांत्रिक कारणांनी मुंबईतून विमान उड्डाण करण्यास परवानगी मिळत नसल्याने जड अंतःकरणाने हा दौरा रद्द करावा लागत असल्याचा खुलासा मुंडे यांच्याकडून करण्यात आला होता.



# इंटॅक तर्फे जागतिक वारसा दिवस उत्साहात साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती:**

इंडिअन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरीटेज अर्थात इंटॅक संस्थेच्या अमरावती अध्याय तर्फे जागतिक वारसा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. मानवी इतिहासात ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा त्या-त्या समाजाच्या व देशाच्या जडणघडणीत महत्वाची भूमिका पार पाडत असतात. आपला वारसा आपली ओळख असतो. या वारस्याचे जतन करण्यासाठी १८ एप्रिल हा दिवस जागतिक वारसा दिवस म्हणून जगभरात साजरा केला जातो. सांस्कृतिक व ऐतिहासिक ठिकाणे आणि इमारती किंवा वास्तूंचे संवर्धन व त्यासाठी जनजागृती होण्याच्या दृष्टीने युनेस्कोतर्फे १९८३ पासून हा दिवस जगभरात साजरा केला जातो. यावर्षी या दिवसाची मध्यवर्ती संकल्पना अर्थात थीम युद्धजन्य स्थिती आणि नैसर्गिक आपत्तीच्या छायेतील वारसा स्थळे अशी असून आंतरराष्ट्रीय स्तरावर हा दिवस साजरा केला जातो.या दिवसाचे औचित्य साधून इंटॅक अमरावती अध्याय तर्फे वारसा दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्याने अमरावती येथील प्रसिद्ध संशोधक, पेटंट मॅन तथा अमरावती जिल्ह्याच्या सीमेवर आदिमानवाच्या गुफांचे शोधकर्ता प्राचार्य डॉ. व्ही. टी. इंगोले यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंटॅकच्या जेष्ठ सभासद प्रा. डॉ. नेहा भटकर होत्या. यावेळी मंचावर इंटॅक अमरावती अध्याय संयोजक डॉ. जयंत वडतकर व सह-संयोजक तुषार वरणगावकर यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम डॉ. व्ही. टी. इंगोले आणि त्यांच्या चमूने सातपुड्यातील आदिमानवाच्या वस्तीस्थानांचा शोध घेऊन तेथील भित्तीचित्रे यांचा अभ्यास व विश्लेषण करून हा ३५ हजार वर्षापूर्वीचा वारसा जगासमोर उलगडून दाखविला, त्याबद्दल इंटॅक अमरावती अध्याय तर्फे डॉ. व्ही. टी. इंगोले सरांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तुषार वरणगावकर यांनी केले, त्यांनी आपल्या प्रास्ताविकात इंटॅक संस्थेची ओळख व या संस्थेकडून वारसा संवर्धनासाठी विविध क्षेत्रात केल्या जाणाऱ्या कार्याची माहिती दिली. इंटॅक अमरावती अध्याय संयोजक डॉ. जयंत वडतकर यांनी त्यांच्या भाषणातून जागतिक वारसा दिवसाचे महत्व विषद करतांना आपल्या देशातील सांस्कृतिक, नैसर्गिक आणि ऐतिहासिक वारसा स्थळे व ठिकाणांची माहिती देऊन त्यांच्या संवर्धनासाठी सर्वांनी पुढे येण्याचे आवाहन केले. पुढील वर्षभरात अमरावती अध्याय तर्फे अमरावती जिल्ह्यातील वारसा स्थळांची नोंदणी करण्यासाठी प्रकल्प राबविण्यात येणार असल्याची माहिती सुद्धा यावेळी दिली. कार्यक्रमाचे संचालन ॲड. राजमेहेर निशाने यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. अनिरुद्ध देशमुख यांनी केले. डॉ. व्ही. टी. इंगोले यांनी आपल्या माहितीपूर्ण सादरीकरणाच्या माध्यमातून मध्य भारतातील सातपुड्यातील ३५००० वर्षापूर्वी पासून ते ३००० वर्षापर्यंत आदिमानवाची वसतिस्थाने व त्यांच्या गुफा चित्रातून इतिहासपूर्व काळातील प्राचीन वारसा उपस्थितांसमोर उलगडून दाखविला. अमरावती वरून फक्त ६० किमी अंतरावर असलेल्या या ठिकाणांचा शोध व त्याच्या अभ्यासाची रंजक कहाणी सुद्धा त्यांनी आपल्या भाषणातून मांडली.




जागतिक वारसा दिनाच्या निमित्याने अभ्यासकांसाठी व इंटॅकच्या सभासदांसाठी ही एक पर्वणी असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी इंटॅक संस्थेचे सभासद डॉ. गोविंद तीर्मनवार, डॉ. प्रशांत शिंगवेकर, प्रा. अभिजित मेंढे, प्रा. मनीष गायकवाड, प्रा. मंजुषा वाठ, प्रा. अनंत वडतकर, अंकुश गावंडे, सर्वेश मराठे, सतेज केचे, जगदीश गुप्ता, डॉ. ज्ञानेश्वर भगत, सौ. मुक्ता वरणगावकर, सौ. वर्षा वडतकर, नितीन झगडे, प्रा. विनोद भटकर, प्रा. श्रीकांत व्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री. किरण मोरे, मयुरी कथलकर, सुमित अंबुलकर, मल्हार पुंडलिक आदींनी अथक परिश्रम घेतलेत.

# स्व. रोहित हंसा दिलीप पोपट यांच्या स्मृति प्रित्यर्थ रघुवीरचा समाजोयोगी उपक्रम



## रघुवीर तर्फे १ लीटर ठंडा पाण्याची बॉटल १० रुपयात उपलब्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

.अमरावती शहरातील प्रसिद्ध रघुवीर तर्फे स्व. रोहित दिलीप पोपट यांच्या स्मृति प्रीत्यथ्य यांच्या जन्मदिन पोपट परिवार तर्फे श्याम चौक येथील प्रतिष्ठान उन्हाळ्याच्या दिवसात अत्याआवाक्षक अशा उपक्रमाची जेष्ठ सामाजिक कार्यकरते डॉ. गोविन्द कासट यांच्या हस्ते सुरवात करण्यात आली.

उन्हाळ्याच्या दिवसात रघुवीर तर्फे १ लीटर ठंडा पाण्याची बॉटल ना नफा त्यावर १० रुपयात उपलब्ध होणार आहे

या उपक्रमा ला पोपट परिवारातील सर्व दिलीप भाई, सौ हंसा बेन, चंद्रकांत भाई, नीलेश भाई, प्रियेश भाई, निहाल भाई, माधव भाई, रोहन पोपट, मंडळीसोबत सुशील भाई गोलछा, नरेंद्र भाई बगड़ाई, राजू भाई (आरिफ भाई) वरुण गंडेचा कन्हैयाभाई बगड़ाई, कृष्णा लाखानी, मयूर वंजारा, वासुदेव वाघमारे, श्रीराम चुम्बलवार, विवेक शास्त्रबुद्धे, राजेंद्र पछगाड़े, अमोल पोहनकर, संदीप आग्राम, इत्यादि मंडली सह रघुवीर ग्राहक मंडळी मोठ्या संख्यने हजार होती सुरुवातील डॉ गोविन्द कासट सह रघुवीरचे बागबान स्व मंगलजीभाई पोपट व रोहित भाई पोपट यांचा प्रतिमाचे पूजन केले. डॉ गोविन्द कासट यांनी समाज सेवेचे वत अग्रेसर असणाऱ्या, अमरावती नाव कमावीलेल्या सम्पूर्ण रघुवीर परिवार चे अभिनंदन केले. संचालन, आभार प्रदर्शन प्रियेश पोपट यांनी केले.

# धामक गावाचे पुनर्वसन मॉडेलच करणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

### आ.प्रतापदादा अडसड यांचा पुढाकार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती-**

तालुक्यातील धामक गावाची पुनर्वसन करण्याची प्रक्रिया प्रशासनाकडून एकीकडे सुरू असताना बुधवारी अमरावती येथील । श्री संत ज्ञानेश्वर महाराज सांस्कृतिक भवन येथे सानुग्रह अनुदान वाटप कार्यक्रमामध्ये आमदार प्रताप अडसड यांनी धामक गावचे मॉडेल पुनर्वसन करण्याची मागणी केली. त्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गावचे पुनर्वसन मॉडेलच करणार अशी घोषणा यावेळी केली.

धामक गावचे पुनर्वसन करण्याची प्रक्रिया प्रशासनाकडून सुरू आहे. त्यात गावचे पुनर्वसन राज्यात मॉडेल कसे ठरेल याकरिता आमदार प्रताप अडसड यांच्याकडून प्रयत्न सुरू आहेत. त्याच अनुषंगाने अमरावती श्री संत ज्ञानेश्वर महाराज सांस्कृतिक भवन येथे विदर्भबळीराजा प्रकल्प समितीच्या वतीने आयोजित सामुग्रह अनुदान वाटप कार्यक्रमांमध्ये आमदार अडसड यांनी धामक गावाचे मॉडेल पुनर्वसन करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. धामक गावचे पुनर्वसन लवकरात लवकर कसे करता येईल यासाठी प्रयत्न सुरू असून आमदार प्रताप अडसड याबद्दल वेळोवेळी आढावा घेत आहेत.

# रेल्वे गेट कायमचे बंद झाल्यामुळे शेतकरी, पशुपालकांसमोर पेच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९चांदुर रेल्वे**

शहरातील शिवाजी नगरातील रेल्वे स्टेशनजवळील उड्डाणपूल सुरू झाल्यामुळे रेल्वे गेट कायमचे बंद करण्यात आले आहे. गेट कायमचे बंद झाल्यामुळे शेतकरी, पशुपालकांची पंचाईत झाली आहे. अंडरपासचे काम पूर्ण होईपर्यंत रेल्वे गेट सुरू ठेवावे, अशी मागणी रेल रोको कृती समितीतर्फे मंगळवारी स्थानक प्रबंधकांमार्फत डीआरएम (नागपूर) यांना पाठविलेल्या



प्रशासनाकडे निवेदनातून केली. रेल्वे गेट सुरू असताना अनेक शेतकरी, शेतमजूर, पशुपालक ये-जा करीत होते. उड्डाणपुलावरून जनावरे,बैलबंडी घेऊन जाणे धोक्याचे आहे. गेटजवळून काही अंतरावर बोगद्याचे काम सुरू असून, ते अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे ते काम मागणी पूर्ण होईपर्यंत रेल्वे गेट सुरू ठेवण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे. रेल्वे गेट तत्काळ सुरू न झाल्यास आंदोलन करावे लागेल, असाइशाराही रेल रोको कृती समितीने दिला.

निवेदन देताना रेल रोको कृती समितीचे अध्यक्ष नितीन गवळी, सदस्य मेहमूद हुसैन, बंडू यादव, गजानन यादव, विनोद जोशी, भीमराव खलाटे, कैलास बाबर, संजय डगवार, महादेव शेंद्रे, प्रा. प्रसेनजित तेलंग, जगदीश सावध, हेमचंद बागमार, संतोष मगर, मारोतराव डोंगरे, सुरेश यादव यांसह शिवाजीनगर व परिसरातील शेतकरी, पशुपालक उपस्थित होते.

# वाढत्या तापमानाने आंबिया बहर धोक्यात; संत्रा फळाला गळती

### मजुरांचा पत्ता नाही

दिवसा भयंकर तापमानामुळे दुपारी शेतावर मजूर जात नाहीत. फक्त शेतकरी शेतात दिसून येतात. कारण हल्ली शेतीकरिता महावितरणने दिवसाचा स्लॉट दिला असल्याने उन्हात शेतकरी संत्रा झाडांना ओलित करताना दृष्टीस पडतात.





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

शेतकऱ्यांनी जिवाचे रान करून महागडी कीटकनाशके, रासायनिक खतांचे व्यवस्थापन करून आंबिया बहरासाठी लाखोंचा खर्च केला. मात्र, गेल्या महिन्यभरापासून तापमानात मोठी वाढ झाली. या उष्णतामानाचा विपरीत परिणाम संत्राबागांवर होत आहे. हजारौंचा खर्च करून फुलवलेल्या बागेत डोळ्यांदेखत टप-टप गळून राहिलेली फळे झाडावरून दिसेनाशी झाल्याने संत्रा-मोसंबी उत्पादक शेतकरी दहशतीत आहेत. संत्रा-मोसंबी फळबागांना उष्माघाताची भीती निर्माण झाली असून, या उष्णतेमुळे संत्रा उत्पादनात मोठी घट होणार असल्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे.अंबिया बहाराचे नियोजन मृग बहाराच्या तुलनेत खर्चीक असते. जोनवारी-फेब्रुवारी महिन्यात झाडावर असलेली फळे वाढत्या तापमानाने झाडावरून गायब झाली आहेत. वरूड तालुक्यात २६ हजार हेक्टरवर लागवड आहे. वाढते तापमान संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे अर्थकारण कोलमडणारे असून, फुललेला अंबिया बहार टिकणार की नाही यामुळे शेतकरी चिंताग्रस्त आहेत. राजुरा बाजार, वडाळा, अमडापूर, वंडली; वघाळ, वाडेगाव, काटी, गाडेगाव, नांदगाव, हातुर्णा, पवनी (संक्राजी) या भागात आंबिया बहार घेतला जातो. विपरीत वातावरणाने आंबिया बहराचे उत्पादन कमी होण्याचा अंदाज आहे, तर दुसरीकडे चांगले बाजारभाव मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# अल्पवयीन युवतीवर वृद्धाचा लैंगिक अत्याचार; पोक्सो दाखल

## एक वर्षापासून करत होता शारीरिक शोषण

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१९वरुड-** युवतीला घरी एकटे पाहून धमकावत तिचे एक वर्षापासून शारीरिक शोषण करणाऱ्या पोस्टमनविरुद्ध वरूड पोलिसांनी गुन्हा दाखल केला. विशेष म्हणजे, त्याने पहिल्यांदा तिच्यावर अत्याचार केला तेव्हा ती अल्पवयीन होती. त्यामुळे या प्रकरणात पोक्सोदेखील दाखल झाला आहे.पोलिस सूत्रांनुसार, प्रकाश तुळशीराम पंडिया (६२, रा. ता. वरुड) असे आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी आता १८ वर्षाची असलेल्या युवतीने वरूड ठाण्यात १७ एप्रिल रोजी तक्रार दिली. त्यानुसार, १ मे २०२४ रोजी १७वर्षांची असलेली युवतीच्या घरी प्रकाश आला होता. घरात एकटी असल्याचे पाहून त्याने घरात प्रवेश मिळविला आणि आई-वडिलांना जिवे मारण्याची धमकी देत तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर संधीचा फायदा घेत तिला वारंवार धमकावत बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्याचा जाच असह्य झाल्याने पीडितेने १७ एप्रिल रोजी वरूड पोलिस ठाणे गाठले. याप्रकरणी पोलिसांनी शारीरिक अत्याचारासह पोक्सो अन्वये गुन्हा दाखल केला आणि आरोपीला अटक केली. पुढील तपास ठाणेदार अर्जुन ठोसरे यांच्या मार्गदर्शनात वरूड पोलिस करीत आहेत.-

# पहिली ते नववीपर्यंत विद्यार्थ्यांच्या अघोषित सुटीला आता लागणार ब्रेक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

पहिली ते नववीच्या परीक्षा ऐन एप्रिलमध्ये कडक उन्हात होत आहेत. ५ ते २५ एप्रिलदरम्यान परीक्षा घेतल्या जाणार आहेत. १ मे रोजी निकाल लावण्याचे आदेश महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने दिले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अघोषित सुटीला ब्रेक लागला आहे.सामान्यतः एप्रिलच्या पहिल्या पंधरवड्यात परीक्षा आटोपून विद्यार्थी १ मेपर्यंत अघोषित सुटीवर जायचे; पण यंदा ही सुटी मिळणार नसल्याचे स्पष्ट आहे. पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा एकाच वेळी घेण्याचे आदेशशासनाने काढले आहेत. त्यानुसार ५ ते २५ एप्रिल यादरम्यान सकाळी ८ ते ११ या वेळेत परीक्षा होणार आहेत. त्याचे वेळापत्रक मुख्याध्यापकांना पाठविण्यात आले आहे. शैक्षणिक वर्षाचा शेवटचा टप्पा सुरू असून तोंडी परीक्षा आटोपल्या आहेत. एप्रिलमध्ये वार्षिक परीक्षा घेतल्या जात आहेत. पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका जतन करून ठेवाव्या लागणार आहेत. या परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा जूनमध्ये लगेच घेतली जाणार आहे. नव्या सत्रात शाळा सुरू होण्यापूर्वी या परीक्षेचा निकालही जाहीर करावा लागेल. यानंतर उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देता येणार आहे.



### उन्हाळ्याची एकच सुटी

दरवर्षी वार्षिक परीक्षा एप्रिलच्या पहिल्या-दुसऱ्या आठवड्यापर्यंत घेतल्या जात होत्या. त्यानंतर महाराष्ट्रदिनी म्हणजेच १ मे रोजी निकाल जाहीर होईपर्यंत अघोषित सुटी व्हायची; पण आता परीक्षा ५ ते २५ एप्रिलपर्यंत घेतल्या जाणार असल्याने कडक उन्हातही विद्यार्थ्यांना परीक्षा संपेपर्यंत शाळेत यावेच लागणार आहे.

### निकालासाठी होणार धावपळ

यंदा शिक्षण विभागाने शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षा २५ एप्रिलपर्यंत चालणार आहेत. यामुळे शिक्षकांना वार्षिक परीक्षा आटोपताच १ मे रोजी परीक्षेचा निकाल जाहीर करायचा आहे.

# जिल्ह्यात ७० गावे तहानली; १२ टँकर अन् ४४ खासगी विहिरींचे अधिग्रहण जलस्रोतांना कोरड

## योजना ठरल्या कुचकामी : मेळघाटात वाढली तीव्रता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

एप्रिलमध्ये तापमान ४४अंशांवर गेल्याने जलस्रोतांना कोरड पहली व पाणीटंचाईची तीव्रता वाढली आहे. उंचावरील दुर्गम भाग असलेल्या मेळघाटात दाहकता वाढली आहे. सद्यःस्थितीत तहानलेल्या १२ गावांत टैंकरने पाणीपुरवठा होत आहे. शिवाय ५७ गावांमध्ये २३ विंधनविहिरी व ४४ खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आलेले आहे.



मार्चअखेर जिल्ह्याचा पारा ४१ अंशांवर व एप्रिल महिन्यात ४३ अंशांचे पार गेला. त्यामुळे भूजल पातळीत कमी आली व पाण्याचे उद्‌द्भव कोरडे पडायला लागले व पाणीटंचाईची चटके जिल्ह्यात जाणवायला लागले आहे.

जिल्हा प्रशासनाच्या माहितीनुसार चिखलदरा तालुक्यातील कोरडा, चुनखडी, आकी, खडीमल, मोथा, लवादा व तारुबांदा धारणी तालुक्यात कढाव, दाबका, रणीगाव, कंजोली, धारणमहू, दिदब्बा व बारू, अमरावती तालुक्यात कस्तुरा, मोगरा, अमडापूर व भानखेडा, मोर्शी तालुक्यात ब्राह्मणवाडा, पिंपळखुटा लहान, गोराळा, शिरजगाव व कोळविहीर, भातकुली तालुक्यात दाढीपेढी, चांदूर रेल्वे तालुक्यात सावंगी, मग्रापूर, टेंभुर्णी, निमला व पाथरगाव,तिवसा तालुक्यात अमदाबाद, फत्तेपूर, जावरा, वठोडा खुर्द, मार्डी व धोत्रा तालुक्यात अधिग्रहणातील विंधनविहीर व खासगी विहिरीद्वारे सद्यस्थितीत पाणीपुरवठा होत आहे.

**या गावांमध्ये वाढली पाणीटंचाईची तीव्रता**

नांदगाव तालुक्यात वाढोणा रामनाथ, खानापूर, हिवरा बु., मंगरूळ चव्हाळा, पळसमंडळ, खेडपिंप्री, वेळी गणेशपूर, लेहगाव, कंझरा, वाटपूर, शिवरा, टाकळी गिलबा, धर्मापूर, राजना व काजना तसेच अचलपूर तालुक्यात बोर्डा, परसापूर, काकडा व सर्फापूर तसेच वरुड तालुक्यात पोरगव्हाण व करजगाव येथे अधिग्रहणातील विंधनविहीर व खासगी विहिरींद्वारे पाणीपुरवठा होत असल्याचे जिल्हा प्रशासनाने सांगितले.

# वाठोडा -शुक्लेशवर - म्हैसपुर मार्गावर वन्य प्राण्यांची पाण्यासाठी भटकंती...



भातकुली तालुक्यातील वाठोडा शुक्लेश्वर म्हैसपुर मार्गावर एका शेतामध्ये असलेल्या पिण्याच्या पाण्याचा एअर वॉल च्या आजूबाजूने पाण्यासाठी वाढत्या उन्हाच्या तापमानामुळे माकडांचा पाणी पिण्यासाठी थवा वाढत्या ४३ तापमानामुळे मनुष्यापासून तर वन्य प्राण्यांना पाण्याची आवश्यकता भासत असल्याने प्रशासनाने वन्य प्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याचे पानवटे उपलब्ध करण्यात यावे असे मागणी नागरिक करीत आहेत. (छाया : गजानन खोपे)

# २० एप्रिल पासून श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी अखंड नामजप यज्ञ सप्ताह प्रारंभ

## श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र रहाटगाव येथे होणार धार्मिक कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

रहाटगाव येथील श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक केंद्रात १९ एप्रिल पासून श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी अखंड नामजप यज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.सप्ताहात शनिवार १९ एप्रिल रोजी यजमानकडून ग्रामदेवता आमंत्रण, रविवार २० एप्रिल ला मंडल स्थापना, अग्निस्थापना, स्थापित देवता हवन, नित्य स्वाहाकार, सोमवार २१ एप्रिल नित्य स्वाहाकार, गणेश याग, मनोबोध याग, मंगळवार २२ एप्रिल नित्य स्वाहाकार, चंडीयाग, बुधवार २३ एप्रिल नित्य स्वाहाकार, स्वामी याग, गुरुवार २४ एप्रिल रोजी नित्य स्वाहाकार , गीताई याग,२५ एप्रिल नित्य स्वाहाकार, रुद्र याग, मल्हारी याग, शनिवार २६ एप्रिल रोजी नित्य स्वाहाकार , बली पूर्णाहुती, श्री सत्यदत्त पूजन, देवता विसर्जन. रोजचे दैनंदिन कार्यक्रम सकाळी सकाळी ५ ते ७.३० श्री गुरुचरित्र वाचनास सुरुवात होईल. सकाळी ७ ते ८ औदुंबर



प्रदक्षिणा, यंज्ञ मंडपातील रोजचे कर्म.

**यजमान जोडप्याकडून स्थापित देवता पूजन प्रधान हवन**

सकाळी ८ वाजता भूपाळी आरती एक माळ श्री स्वामी समर्थ सामुदायिक जप .सकाळी ८ ते १०.४५ नित्य स्वाहाकार, श्री स्वामी समर्थ महाराजांचे मूर्तीचे पूजन व अभिषेक. सकाळी १०.३० वाजतानैवेद्य आरती (मंत्रपुष्पांजली सह) सकाळी १०.४५ ते दुपारी १२ दुर्गा सप्तशती व स्वामी सारामृताचे पारायण. दुपारी ३ ते ५ प्रश्न उत्तरे ,हस्तरेषा, जन्मकुंडली पाहणे ,प्रश्न सोडवणे ,वास्तुशास्त्रावर मार्गदर्शन .दुपारी २ ते ५.३० सांस्कृतिक कार्यक्रम ,गीताई, मनाचे श्लोक वाचन होईल. सायंकाळी ५.३० ते ६ औदुंबर प्रदक्षिणा. सायंकाळी ६.३० वाजता आरती व मार्गदर्शन .सायंकाळी ७ वाजता सायंकाळ ची नित्यसेवा ,गीतेचा पंधरावा अध्याय, विष्णुसहस्रनाम वाचन होईल .तरी सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक केंद्र रहाटगाव येथील विश्वस्त मंडळींनी केले आहे.

# ८४१ ग्रा.पं. मध्ये बेघरांसाठी सर्व्हेक्षणास प्रारंभ

## लाभार्थ्यांची नव्याने यादी तयार करण्याची अधिकाऱ्यांवर जबाबदारी : ३० एप्रिलपर्यंत अभियान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत आवास प्लस सर्वेक्षण २०१८ मध्ये तयार केलेल्या प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ट न झालेले परंतु सद्यःस्थितीत पात्र कुटुंबांना, बेघर व कच्च्या घरात राहणाऱ्या कुटुंबांना घरकुलाचा लाभदेण्यासाठी जिल्ह्यातील ८४१ ग्रामपंचायतींअंतर्गत गावांमध्ये सर्वेक्षणाला सुरूवात केली आहे.



त्यामुळे आता नव्याने घरकुल धारकांची यादी तयार केली जाणार आहे. याची जबाबदारी ग्रामपंचायतीस्तरावर ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडे सोपवली आहे. जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीणविकास यंत्रणेंतर्गत १ ते ३० एप्रिलदरम्यान हे सर्वेक्षण गावस्तरावर केले जाणार आहे.जिल्ह्यात घरकुल मिळण्याकरिता २०१८ मध्ये सर्वेक्षण करण्यात आले होते. यात मोठ्या प्रमाणात लाभार्थी समाविष्ट झाले असले तरी बहुतांश लाभार्थी पात्र असताना सुटल्याची देखील ओरड झाली. दरम्यान, कित्येक लाभार्थ्यांनी घरकुलाकरिता मागणी केली. परंतु, त्यांचे नाव यादीत नसल्याने त्यांना घरकुल देणे प्रशासनाकडून अशक्य होते. त्यामुळे वंचित लाभार्थ्यांमध्ये रोष व्यक्त होत असताना शासनाकडून यंदा पंतप्रधान आवास योजना टप्पा २ अंतर्गत सुमारे ५६ हजारांवर घरकुल मंजूर झाले. यात धर्तीवर यादीतून सुटलेल्या लाभाथ्यर्थ्यांना देखील लाभ देण्याकरिता अशा पात्र लाभार्थ्यांचे सव्र्व्हेक्षण करून त्यांना यादीत समाविष्ट केले जात आहे.

१ एप्रिलपासून सर्वेक्षणाला ४२ सुरूवात झाली असून गावस्तरावर ग्रामपंचायत अधिकारी सदरचेसर्वेक्षण करणार आहे. ग्रामसेवकांना सर्वेक्षणाबाबत माहिती व प्रशिक्षण देण्याकरिता जिल्हास्तरावरुन स्थापत्या अभियंता, डेटा एण्ट्री ऑपरेटर या ४२ कर्मचाऱ्यांना सीईओ संजिता महापात्र व प्रकल्प संचालक प्रिती देशमुख यांच्या मार्गदर्शनात प्रशिक्षण देत मास्टर ट्रेनर करण्यात आले आहे.३० एप्रिलपर्यंत चालणाऱ्या या सव्र्व्हेक्षणात वंचित व यादीतून सुटलेल्या लाभार्थ्यांचे नाव यादीत समाविष्टकेले जाणार आहे. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत आवास प्लस सर्वेक्षण २०१८ मध्ये तयार केलेल्या प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ट न झालेले परंतु सद्य:स्थितीत पात्र कुटुंबांना, बेघर व कच्च्या घरात राहणाऱ्या कुटुंबांना घरकुलाचा लाभ देण्यासाठी जिल्ह्यातील ८४१ ग्रामपंचायतींअंतर्गत गावांमध्ये सर्वेक्षणाला सुरूवात केली. या उपक्रमामुळे यादीतून सुटलेल्या लाभार्थ्यांना आता घरकुल मिळण्याची आशा पल्लवीत झाली.

# कुष्ठरोग प्रतिबंध, निर्मूलनावर दोन दिवसीय प्रशिक्षण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

कोठारा लेप्रसी मिशन हॉस्पिटल आणि सहायक संचालक आरोग्य सेवा कुष्ठरोग कार्यालयातर्फे राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत अधिकारी आणि कर्मचारी यांचे दोन दिवसीय प्रशिक्षण कोठारा येथे पार पडले. 'कुष्ठरोगासंबंधी अपंगत्व प्रतिबंध' यावर दि. १६ आणि १७ एप्रिल रोजी हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.प्रशिक्षणामध्ये कोठारा लेप्रसी मिशन हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मिलिंद चव्हाण, आयएलईपी एनएलईपी कन्सल्टंट सुरेश धोंडगे आणि अलर्ट इंडियाचे श्री. अन्सारी यांनी कुष्ठरोगाचे विविध पैलू आणि प्रतिबंधात्मक उपायांवर मार्गदर्शन केले.प्रशिक्षणात प्रत्यक्ष रुग्णांची तपासणी, रोगनिदान यासारख्या बाबींचे प्रशिक्षण देण्यात आले. जिल्हास्तरीय अवैद्यकीय पर्यवेक्षक दीपक गडलिंग यांनी प्रशिक्षणाचे महत्त्व सांगितले. अलर्ट इंडियाचे फिजिओथेरपिस्ट श्री. अन्सारी यांनी समाजामध्ये वावरताना 'लेप्रसी माइंडसेट' ठेवून लोकांकडे पाहण्याची गरज व्यक्त केली. लवकर निदान आणि उपचार झाल्यास कोणत्याही व्यक्तीला कुष्ठरोगामुळे होणारे संभाव्य अपंगत्व टाळता येऊ शकते, असे त्यांनी सांगितले.सहाय्यक संचालक डॉ. पूनम मोहोकार यांनी कोठारा लेप्रसी मिशन हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मिलिंद चव्हाण, पंचानन गोरैन, मिलिंद चांदेकर आणि त्यांच्या चमूचे आभार मानले.

# उद्या विदर्भ जनआंदोलन समितीची बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

विदर्भ राज्य आंदोलन समिती जिल्हा बैठक २० एप्रिल २०२५ बाबुजी ताजने सभागृह लघुवेतन कॉलनीच्या मागे काँग्रेसनगर रोड या ठिकाणी दुपारी ४ वाजता घेण्यात येणार आहे.या बैठकीला विदर्भ राज्य आंदोलन समिती अध्यक्ष माजी आ. वामनराव चटप, ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर कोडबत्तुनवार, राज्य महिला आघाडी अध्यक्षा रंजना मामर्डे, पश्चिम विदर्भअध्यक्षा पी. यू. राजपूत मार्गदर्शन करणार आहे. १० एप्रिल २०२५ नागपूर येथे ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ श्रीनिवास खांदेवाले यांच्या अध्यक्षतेखाली कोर कमिटीची. बैठक घेण्यात आली होती. या बैठकीतून अर्थतज्ज्ञ श्रीनिवास खांदेवाले यांनी १ मे महाराष्ट्र दिनी धरणे आंदोलनासंबंधी काही निर्देश दिले. त्यानुसार २० एप्रिल २०२५ च्या बैठकीत आंदोलनाची घोषणा करण्यात येणार आहे.या बैठकीला विदर्भप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगरकर, शहराध्यक्ष रियाज खान, जिल्हाध्यक्ष सुषमा मुळे, दिलीप भोयर, माधवराव गावंडे सुनील साबळे, अनुष्का बेलोरकर, अशोक हांडे, राजाभाऊ पुसदेकर, बाबाराव जाधव,सतीश प्रेमळवार, डॉ. विजय कुबडे, दिनेश ढवस, विलास धांडे, दिवाकर राऊत, प्रा. शरद पुसदकर, ज्ञानेश्वर डांगारकर, ॲड. मनोहर देशमुख अफसर भाई, रहमान भाई, मनोज पोपटाणी, ॲड. चेतन परडखे, पांडुरंग बिजवे, संजय हिंगे, विष्णू काळमेघ, साहेबराव इंगळे, दीपक शंभरकर, सुधाकर थेटे, लक्ष्मण वानखडे, गणेश कुसराम, ताराबाई भारस्कर, डॉ. नीलकंठ यावलकर, प्रगती गेडाम, विक्रम सिंह ठाकूर, अजय बेले, सुधाकर गायकी, रामदास ढवले, सत्यप्रकाश गुप्ता, अनिल वानखडे यांनी केले आहे.

# संपूर्ण समृद्धी महामार्गाचे पंतप्रधान २ मे रोजी करणार लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नागपूर**

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते ७०१ किलोमीटर लांबीच्या नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाचे लोकार्पण २ मे रोजी होऊ शकते, अशी माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली आहे. नागपूर ते इगतपुरीपर्यंतच्या ६२५ किलोमीटर लांबीच्या समृद्धी महामार्गावर वाहतूक सुरू होऊन त्याच्या ७६ किलोमीटरच्या अंतिम टप्प्यात म्हणजे इगतपुरी-अमाने (ठाण्याजवळ) पर्यंतचे काम नुकतेच पूर्ण झाले आहे. हे काम पूर्ण झाल्यामुळे वाहन चालक नागपूर ते ठाणे हे अंतर केवळ ७ते ८ तासांत आणि मुंबई आणखी काही तासात गाठणे शक्य होणार आहे.

एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्याने सांगितले की, समृद्धी महामार्गाचा अंतिम टप्पा तयार करणे खूप कठीण होते. महामार्गाचा हा टप्पा सह्याद्री पर्वतरांगेतून जातो. ७६ किलोमीटरमधून ११ किलोमीटरचा हा रस्ता भुयारी आहे.

# दर्यापूर बाजारसमितीमध्ये अभीष्टचिंतन सोहळा : राजू पाटील कराळे यांना दिल्या चाहत्यांनी शुभेच्छा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९दर्यापूर**

कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान उपसभापती श्रीकृष्ण ऊर्फ राजू पाटील कराळे यांना त्यांच्या हजारो चाहत्यांनी समक्ष भेटून, तसेच काहींनी भ्रमणध्वनीद्वारे वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. दर्यापूर कृषी उत्पन्न बाज़ार समितीचे विद्यमान उपसभापती तथा सांगवा ग्रामपंचायतचे सरपंच श्रीकृष्ण ऊर्फ राजू पाटील कराळे



यांच्या वाढदिवसानिमित्त कृषीउत्पन्न बाजारसमिती येथे छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी वाढदिवसाच्या निमित्ताने दर्यापूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुधाकर पाटील भारसाकळे यांच्याहस्ते, तर सभापती सुनील पाटील गावंडे यांच्या अध्यक्षतेखाली राजू पाटील कराळे यांचा शाल, श्रीफळ, बुके व रोपटे भेट देऊन मान्यवरांच्या उपस्थितीत अभीष्टचिंतन करून उदंड व निरोगी आयुष्याच्याशुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष तथा काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष सुधाकर पाटील भारसाकळे, कृषी उत्पन्न बाजारसमितीचे सभापती सुनिल पाटील गावंडे, जिल्हा सचिव ईश्वर बुंदिले, बाजारसमितीचे संचालक राजुशेठ राठी, संचालक प्रभाकर पाटील तराळ, संचालक असिफ भाई खान, संचालक भारत आठवले, राजीव खेडकर, संचालक अनिल पाटील भारसाकळे, गाडगेबाबा बालगृहाचे संचालक गजानन देशमुख, गोपाल अग्रवाल, अजय देशमुख, दत्ता पाटील कुंभारकर, संतोष मिसाळ आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमप्रसंगी मिलिंद तराळ, अनिल साखरे, निलेश मिसाळ, आकाश पुंडकर, प्रमोद सगणे आदी पदाधिकारी कर्मचारी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

# पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मठाधिपती जितेंद्रनाथ महाराज यांच्या घरी सांत्वनपर भेट....



अमरावती जिल्ह्यातील सुर्जी अंजनगावच्या देवनाथ मठाचे मठाधिपती परमपूज्य श्री जितेंद्रनाथ महाराज यांच्या मातोश्री कुसुमताई दत्तात्रेय लोमटे यांचे शनिवारी निधन झाले होते आज जिल्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांच्या घरी भेट देत कुसुमताई यांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी त्यांनी श्री जितेंद्रनाथ महाराज यांच्या सोबत चर्चा हि केली.

# विदर्भातही बरसणार 'छप्पर फाड'पाऊस, बळीराजासाठी आनंदवार्ता, हवामानतज्ज्ञांनी व्यक्त केला अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नागपूर**

भारतीय हवामान विभागाने यंदा संपूर्ण देशात सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज वर्तविला असून, विदर्भातही मॉन्सून दणक्यात बरसणार असल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तसा अंदाज हवामानतज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.त्यामुळे वैदर्भीय शेतकऱ्यांसाठी ही आनंदाची बातमी आहे. पण कमी अवधीत थो-थो पाऊस आणि मथल्या काळात मोठा खंड पडण्याची शक्यता असल्याने थोडी चिंताही वाढणार आहे. भारतीय हवामान विभागाने नुकताच नैऋत्य मोसमी पावसाचा (मॉन्सून) पहिला दीर्घकालीन अंदाज वर्तविला आहे. त्यानुसार, देशभर सरासरीच्या १०५ टक्के पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.विदर्भावर यंदा मॉन्सून मेहरबान राहणार आहे. यासंदर्भात प्रसिद्ध हवामानतज्ज्ञ प्रा. सुरेश चोपणे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, हवामान विभागासह स्कायमेटनेही यावर्षी देशभर दमदार पावसाचा अंदाज वर्तविला आहे. त्यामुळे यंदा जून ते सप्टेंबरदरम्यान विदर्भात भरपूर पाऊस बरसणार आहे.उल्लेखनीय म्हणजे, यंदाच्या पावसाळ्यावर 'एल निनो' आणि 'ला निना'चाही प्रभाव नाही, जे चांगले संकेत आहेत. भरपूर पाऊस अपेक्षित असला तरी, शेतकरी व शहरी भागांत राहणाऱ्यांसाठी थोडी चिंताजनक बाबही राहणार आहे. प्रा. चोपणे यांच्या मते, यंदा विदर्भात बऱ्याच ठिकाणी कमी अवधीत अपेक्षेपेक्षा अधिक पाऊस किंवा अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आर्थिक नुकसान होण्याची दाट शक्यता आहे.याशिवाय मधल्या काळात पाऊस अचानक गायब होऊन मोठा खंडही पडू शकतो. त्यामुळे या दोन्ही गोष्टी बळीराजासह शहरी भागांत राहणाऱ्या नागरिकांचीही डोकेदुखी वाढविणार आहे. विशेष म्हणजे, विदर्भात दरवर्षी सरासरी ९३७ मिलिमीटर पाऊस पडतो. अनुकूल परिस्थितीमुळे यंदा पावसाचे प्रमाण अधिक राहणार आहे.



### अवकाळीचा मॉन्सूनवर परिणाम नाही

प्रा. चोपणे यांनी विदर्भातील अवकाळी पावसाचा आगामी मॉन्सूनवर परिणाम होणार नसल्याचेही यावेळी स्पष्ट केले. ते म्हणाले, साधारणपणे कडक उन्हाळ्यावर पाऊस अवलंबून असतो. एप्रिलमध्ये पाऊस व ढगाळ वातावरण असले तरी, अजूनही मे महिना शिल्लक आहे. मे मध्ये किमान पंधरा दिवस उन्हाची लाट राहिली तरी पुरेसे आहे. उल्लेखनीय म्हणजे, एप्रिल व मे मध्ये सूर्य आग ओकण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या दर्जेदार शिक्षणासाठी 'अॅक्शन प्लॅन'; आता शिक्षकांच्या गुणवत्ता वाढीवर भर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

आदिवासी विद्यार्थी स्पर्धात्मक युगात टिकावा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी राज्य शासनाच्या आदिवासी विकास अमरावती विभागाने 'क्शन प्लॅन' तयार केला आहे. त्याकरिता शिक्षकांना अगोदर प्रशिक्षित केले जाणार असून २१ ते २९ एप्रिल दरम्यान होणाऱ्या कार्यशाळेत येत्या शैक्षणिक वर्षांचे नियोजन तयार केले जाणार आहे. 'आनंददायी अध्ययन व अध्यापन' यावर भर देण्यात येणार आहे. अमरावती विभागाचे अपर आयुक्त जितेंद्र चौधरी यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविला जाणार आहे.

डोंगर, दऱ्या, खोरे आणि वस्ती, वाड्यातील आदिवासी मुलांनी उच्च शिक्षणात झेप घ्यावी. स्पर्धा परीक्षांत सहभाग घेऊन प्रशासकीय सेवेत सहभागी व्हावे, यासाठी आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पायाभरणीवर भर दिला जात आहे. यात इयत्ता पहिली ते चौथी आणि पाचवी ते १२ वीपर्यंत शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्यांचा समावेश असणार आहे. येत्या शैक्षणिक वर्षात आदिवासी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षण देण्यावर 'फोकस' आहे. आश्रमशाळांमध्ये १०० टक्के उपस्थितीवर भर देण्यात आला आहे. सात एकात्मिक अधिकारी प्रकल्प कार्यालय स्तरावर विषय शिक्षकांच्या गुणवत्ता वाढीसाठी कार्यशाळा, प्रशिक्षण होऊ घातले आहे.

# दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांनो तयार रहा!

## दहावी आणि बारावीचा निकाल येत्या १५ मेपर्यंत जाहीर होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावी आणि बारावी परीक्षेच्या निकालाच्या तारखेबद्दल महत्वाची माहिती समोर आली आहे. दहावी आणि बारावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसह त्यांचे पालक आता निकालाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यांची निकालाची प्रतीक्षा लककरच संपणार आहे कारण निकालाची संभाव्य तारीख समोर आली आहे. महाराष्ट्र बोर्डाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दहावी-बारावीच्या निकालाबाबत महत्वाची माहिती दिली आहे. दहावी आणि बारावीचा निकाल येत्या १५ मेपर्यंत जाहीर होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.



दहावी आणि बारावीची परीक्षा होऊन एक महिना झाला. परीक्षा झाल्यानंतर विद्यार्थी टेन्शन फ्री झाले होते पण आता लवकरच निकाल लागणार असल्यामुळे ते चिंतेत देखील आले आहेत. बोर्डाकडून दहावी आणि बारावीच्या निकालाची तयारी जोरदार सुरू आहे. पेपरची तपासणी अंतिम टप्प्यात आहे. अशामध्ये निकालची तारीख देखील समोर आली आहे. येत्या १५ मे रोजी दहावी आणि बारावीचा निकाल लागणार असल्याचे सांगितले जात आहे. महाराष्ट्र बोर्डाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी ही शक्यता वर्तवली आहे.

साधारणत: बारावीचे निकाल हे मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आणि दहावीचे निकाल हे जूनच्या पहिल्या आठवड्यात लागतात. मागच्या वर्षी बारावीचा निकाल २१ मे रोजी लागला होता. तर दहावीचा निकाल २७ मे रोजी जाहीर झाला होता. पण यावर्षी दहावी आणि बारावीचा निकाल लवकर जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे निकाल पाहण्यासाठी विद्यार्थी आणि पालकांनी तयार राहावे असे सांगितले जात आहे.दहावी आणि बारावीचा निकाल तुम्ही ऑनलाइन पाहू शकता. यासाठी विद्यार्थ्यांकडे त्यांच्या हॉल तिकीटाचा नंबर असणे आवश्यक आहे. दहावी आणि बारावीचा निकाल तुम्हाला कोण-कोणत्या वेबसाइटवर पाहयला मिळणार हे घ्या जाणून....

mahahsscboard.in
mahresult.nic.in
hscresult.mkcl.org
msbshse.co.in
mh-ssc.ac.in
sscboardpune.in
sscresult.mkcl.org
hsc.mahresults.org.in

असा चेक कराल निकाल

विद्यार्थ्यांनो सर्वात आधी बोर्डाच्या अधिकृत बेवसाइटवर जा.

होमपेजवर 'महाराष्ट्र एसएससी/एचएससी निकाल २०२५' लिंक दिसेल. त्या लिंकवर क्लिक करा.

क्लिक करताच नवीन विंडो उघडेल. त्याठिकाणी सीट नंबर टाका नंतर आईचे अचूक नाव टाका. त्यानंतर 'सबमिट' बटनवर क्लिक करा.त्यानंतर तुमचा रिझर्ट स्क्रीनवर दिसेल.


हा रिझर्ट डाऊनलोड करून ठेवा.

# धामणगाव शहराची भर दिवसा तब्बल आठ तास बत्ती गुल

## खंडित वीजपुरवठ्याचा धामणगाव शहरासह तालुक्यातील नागरिकांना 'शॉक' : विजेचा लपंडावाने नागरिक त्रस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९धा.रेल्वे**

हवेची झुळुक आली की, काही ठिकाणी वीज खंडित होत असल्याने शहरासह तालुक्यातील नागरिक त्रस्त झाले आहे.ऐन उन्हाळ्यात एकीकडे उन्हामुळे तर दुसरीकडे वीज वितरणच्या कारभाराने नागरिक त्रस्त आहेत.दरम्यान शनिवारला (ता.१९) तब्बल आठ तास वीज पुरवठा खंडीत असल्याने नागरिकांना उकाड्याचा सामना करावा लागला.



काही भागांत विद्युत वाहिन्यांच्या कमीअधिक दाबामुळे विद्युत उपकरणांचेही नुकसान झाले आहे. मात्र महावितरण कंपनीला या सगळ्य़ाशी आणि नागरिकांच्या त्रासाशी काहीच देणेघेणे नसल्यासारखाच त्यांचा कारभार सुरू आहे, असे दिसते.

दरवर्षी उन्हाळा आला की विजेचा लपंडाव सुरू होतो. परंतु यावर आतापर्यंत योग्य उपाययोजना करण्यात आली नाही. सोसाट्याच्या वाऱ्यात झाडाच्या फांद्या विद्युत तारेवर पडून विद्युत वाहिन्या तुटतात. त्यामुळे महावितरणने याकडे लक्ष देवून यावर उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.जोरात हवा आली की, शहरासह तालुक्यातील काही ठिकाणी खंडित वीज पुरवठा होतो .वीज खंडित झाल्यानंतर नागरिकांना विजेअभावी त्रास सहन करावा लागतो .शहरासह तालुक्यातील ग्रामस्थ विजेच्या लंपडावाने कमालीचे हैराण झाले आहेत. याबाबत वारंवार तक्रार करूनही वीज वितरण कंपनी ही बाब गांभीर्याने घेत नसल्याने नागरिकांमध्ये वीज वितरण कंपनीविषयी रोष व्यक्त होत आहे.अचानक आलेल्या हवेमुळे विद्युत पुरवठा खंडित होणे नेहमीचे झाले आहे. महावितरणच्या या कारभाराबाबत नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.मागील काही दिवसांपासून विद्युत पुरवठा खंडीत होणे, विद्युत दाब अचानक कमी जास्त होणे, वीज पुवठा खंडीत करणे, यासारखे प्रकार नेहमीचेच झाले आहेत. चुकून एखादे वेळी वीज पुरवठा सुरू झाला तर तो पुन्हा कधी खंडीत होईल याचा अंदाजही नसतो.

वीजपुरवठा खंडित होण्याचे संभाव्य धोके टाळण्यासाठी महावितरणकडून दरवर्षी देखभाल व दुरुस्तीचे कामे केली जातात. वीजवाहिन्यांना स्पर्श करणाऱ्या झाडांच्या लहान फांद्या तोडून टाकणे, तुटलेले पीन व डिस्क इन्सूलेटर्स बदलणे, वितरण रोहित्रांचे अर्थिंग तपासणे,ऑईल फिल्टरेशन, उपकेंद्रातील ब्रेकर्सची दुरुस्ती, फ्युज बदलणे, भूमिगत केबल टाकणे, खांब आणि तारांचे मजबुतीकरण, वीज खांब, तारा बदलणे किंवा झोल काढणे, वीज तारांजवळील झाडांच्या फांद्याची छाटणी, जुन्या फिडर पिलरमध्ये 'इन्सूलेशन स्प्रे' मारणे तसेच पावसाचे पाणी साचणाजया परिसरातील फिडर पिलरची जमिनीपासून उंची वाढविणे अशा विविध प्रकारच्या कामांचा समावेश आहे.परंतु हवेची झुळुक येताच वीज खंडित होत असल्याने कामांबाबत प्रश्नचिन्ह लागले आहे. वीजपुरवठा खंडित होत असल्याचा सर्वांत मोठा फटका दुकादारांना होत आहे. दुग्धजन्य पदार्थांची मोठ्या प्रमाणत नासाडी होत असून, परिणामी अनेकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. नागरिकांकडून वीज बिलाची रक्कम विद्युत वितरण विभाग तत्परतेने वसूल करते. एखाद्या ग्राहकाने वेळेवर वीज बिलाचा भरणा केला नाही तर तातडीने त्याची वीज जोडणी तोडली जाते. परंतु, वीजपुरवठा सुरळीत करण्याकडे महावितरण दुर्लक्ष करत असल्यामुळे नागरिकांनी संपात व्यक्त केला आहे.

### वीज वाहिनी तारांना वेलींचा विळखा

शहरासह तालुक्यातील काही वीज वाहिनी तारांना वेलींनी विळखा घातला आहे.त्यामुळेही वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे.या समस्येकडे वीज कंपनीचे दुर्लक्ष होत आहे.वीज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा ८६०५९४८८५३

# रोजगार हमी योजनेच्या मजुरीत १५ रुपयांची वाढ, ही तर थट्टाच !ग्रामीण मजुरांमध्ये नाराजी

## म्हणतात, वाढत्या महागाईच्या दिवसात कसा भागवायचा खर्च ?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

१ एप्रिलपासून विजेचे बिल प्रति युनिट ६० पैशांनी महागले असताना शासनाने कडक उन्हात राबणाऱ्या रोहयो मजुरांच्या मजुरीत दिवसाला केवळ १५ रुपयांची वाढ केली आहे. त्यामुळे रोहयो मजुरांत नाराजीचा सूर असून ही मजुरांची थट्टाच असल्याची भावना व्यक्त होत आहेत. या वाढत्या महागाईच्या दिवसात आम्ही खर्च कसा भागवायचा, असा प्रश्न आता विचारला जात आहे.एकीकडे खासदार व आमदारांचे वेतन, तसेच शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन भरमसाठ वाढले असताना रोहयो मजुरांच्या मजुरीत तुटपुंजी वाढ करण्यात आली आहे. शासन कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात भरीव वाढ करीत असताना मजुरांना महागाईची झळ बसत नाही का, असा प्रश्नही या निमित्ताने विचारला जात आहे.



### एप्रिलपासून मिळणार वाढीव मजुरी

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यातील मजुरांच्या रोजंदारीत फक्त १५ रुपयांची वाढ जाहीर करण्यात आली आहे. यानुसार १ एप्रिलपासून प्रतिदिन ३१२ रुपये मजुरी लागू झाली आहे.


### ही कामे केली जातात मग्रारोहयोतून

शासन ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीसाठी दरवर्षी रोहयो कामे मजुरांना उपलब्ध करतो. विविध योजनांतर्गत सिंचन विहिरी, वृक्षारोपण, शेततळे, घरकुल, गोशाळा, बकरी शेड यासारखी कामे रोजगार हमी योजनेतून केली जातात. पाच एकरापेक्षा कमी जमीनधारक लाभार्थी आणि जॉबकार्डधारक मजुरांना या योजनेंतर्गत रोजगाराचा लाभ मिळतो.

# वाढत्या उन्हाच्या तीव्रतेने सारेच झाले घामाघूम आरोग्याला फटका : कूलर, पंख्यांचा वापर वाढला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

जिल्ह्यात यंदा एप्रिल महिन्यात दिवसागणिक उन्हाची तीव्रता अधिकच वाढत चालली आहे. तीव्र उन्हाचा आरोग्याला फटका बसत आहे. वातावरणात उष्मा वाढू लागल्याने भर दुपारी नागरिक घराबाहेर पडणे टाळत आहेत. त्यामुळे रस्त्यांवर शुकशुकाट असतो. प्रत्येकजण उन्हापासून बचाव करण्यासाठी थंडगार सावलीचा आसरा शोधत आहेत. नागरिक उकाड्याने हैराण झाल्याने घरातील कूलर, पंखे गरगर फिरू लागले आहेत. ग्रामीण भागात मात्र अशा उन्हातान्हातही लग्नसराईची लगबग सुरू आहे.शेतकरी व मजूर हे सकाळच्या सुमारास कामधंद्याला प्राधान्य देत आहेत. दिवसा दुपारचा उन्हाचा पारा चढत असून, सकाळी व संध्याकाळी मात्र वातावरणात थोडाफार थंडावा जाणवत आहे. परिणामी, वाढत्या उकाड्यापासून थोडासा का होईना दिलासा मिळत आहे. सूर्यनारायण वर येऊ लागला की, सकाळी नऊ-दहा वाजल्यापासूनच उन्हाच्या चटक्यांनी नागरिक हैराण होऊ लागले आहेत. दुपारी काही वेळ झाडांच्या थंडगार सावलीच्या नागरिक विसावा घेत असल्याचे दृश्य आहे. थंडगार पाण्यासाठी मातीच्या माठांचा वापर होत असून, घरातील जुने माठही वापरात येऊ लागले आहेत.



### ऊन लागले, तर उपचार घ्या

उन्हाच्या झळा प्रखर झाल्याने उष्मा अन् उकाड्याचा त्रास जाणवू लागला आहे. कमाल-किमान तापमानात होणाऱ्या वाढीमुळे नागरिकांची चिंता वाढली आहे. उध्यापासून बचाव करण्यासाठी नागरिकांकडून वातानुकूलित यंत्रणेचा वापर केला जात आहे. पुढील दिवसांमध्येही कमाल तापमानाचा पारा चढता राहण्याची शक्यता वर्तविली जात असल्याने आरोग्याबाबत नागरिकांना अधिकाधिक खबरदारी घ्यावी लागणार असल्याचे मत वैद्यकीय तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.